दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–५० | शनिवार दि.९ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### मोफत योजनांची राजकारणशाही

लोकशाही आणि निवडणूक या एकाच नाण्याच्या दोन बाजू मानल्या जातात. लोकशाहीची खरी ताकद ही जनतेच्या विवेकपूर्ण मतदानात, विकासाभिमुख धोरणांत आणि उत्तरदायी शासनात असते. परंतु गेल्या काही दशकांमध्ये भारतीय निवडणूक प्रक्रियेचा प्रवास ज्या दिशेने होत आहे, तो पाहता लोकशाही हळूहळू धनशाही, लोकलाडावणूक आणि मोफत योजनांच्या राजकारणाकडे झुकताना दिसत आहे. मतदारांच्या दीर्घकालीन हितापेक्षा अल्पकालीन आर्थिक लाभ महत्त्वाचे ठरू लागले आहेत.

# भाडेपट्ट्याने शेत कसणाऱ्या शेतकऱ्यांनाही पीक कर्ज !

## सरकारचा महत्त्वपुर्ण निर्णय, पीक विम्याचाही मिळणार लाभ

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने शेतजमीन भाडेपट्ट्याने देण्याच्या प्रक्रियेला कायदेशीर आणि पारदर्शक स्वरूप देण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, 'महाराष्ट्र शेतजमीन भाडेपट्ट्याने देण्याबाबत अधिनियम, २०१७' तसेच 'नियम २०२४' यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महसूल विभागाने सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या निर्णयामुळे राज्यातील हजारो भूमिहीन, अल्पभूधारक आणि अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी शेतीच्या नवीन संधी उपलब्ध होणार असून, पट्टेदार शेतकऱ्यांना आता पीक कर्ज, पीक विमा, आपत्ती निवारण मदत आणि विविध



शासकीय योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महसूल विभागाने स्पष्ट केले आहे की, यापुढे प्रत्येक शेतजमीन पट्टाकरार हा 'नोंदणी अधिनियम, १९०८' अंतर्गत रीतसर नोंदणीकृत असणे बंधनकारक राहणार आहे. यामुळे शेतजमीन भाडेपट्ट्याने देण्याच्या व्यवहारात कायदेशीरता आणि पारदर्शकता निर्माण होणार आहे. आतापर्यंत राज्यातील विविध कुळवहिवाट आणि जमीनविषयक कायद्यांतील निर्बंधांमुळे जमीनमालक आणि शेतकरी अनौपचारिक करारांवर अवलंबून राहत होते. त्यामुळे पट्टेदार शेतकरी शासकीय लाभांपासून वंचित राहत होते, तर जमीनमालकांमध्ये जमीन गमावण्याची भीती निर्माण होत होती.ङ्गशासनाच्या मते, या नव्या कायदेशीर चौकटीमुळे जमीनमालकांचे हक्क पूर्णपणे सुरक्षित राहतील. त्याचबरोबर भूमिहीन आणि गरीब शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी जमीन उपलब्ध होण्यास मदत होईल. कृषी क्षेत्रात कार्यक्षमता ◀◀ पान २ वर

### भाडेपट्टे आता कायदेशीर चौकटीत

या निर्णयामुळे राज्यातील शेती व्यवस्थेमध्ये मोठा बदल अपेक्षित असून, अनौपचारिक पद्धतीने होणारे भाडेपट्टे आता कायदेशीर चौकटीत येणार आहेत. परिणामी जमीनमालक आणि पट्टेदार शेतकरी यांच्यातील विश्वास वाढण्यास मदत होईल, तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही नवी चालना मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## थोडक्यात...

### जोडप्याने श्रीलंकेहून पोहत गाठला भारत

**बंगळुरू :**–येथील एका धाडसी जोडप्याने थेट समुद्राच्या लाटांनाच आव्हान देत एक नवा इतिहास रचला आहे. दानिश अब्दी आणि वृषाली प्रसाद या जोडप्याने श्रीलंका ते भारत हे समुद्रातील साधारण ३२ किलोमीटरचे अंतर पोहून पार करत एक प्रेरणादायी कामगिरी बजावली आहे. दानिश आणि वृषाली यांचे हे यश आजच्या तरुणाईसाठी धैर्य, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाचे एक उत्तम उदाहरण बनले आहे. या मोहिमेची सुरुवात श्रीलंकेतील तलाईमन्नार येथून झाली. समुद्राचा प्रचंड वेग, सतत बदलणारे प्रवाह आणि शारीरिक थकवा यांसारख्या अनेक आव्हानांशी झुंज देत दानिश आणि वृषाली यांनी सलग १० तास ४५ मिनिटे पोहून भारतातील धनुष्कोडी गाठले. विशेष म्हणजे, हा पोहण्याचा मार्ग ऐतिहासिक ॲडम्स ब्रिज जवळून गेल्याने या मोहिमेला एक विशेष सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी संपूर्ण प्रवासादरम्यान एक सहाय्यक पथक, पॅरामेडिक्स आणि तटरक्षक दलाचे पथक सोबत होते.

### विमानप्रवास महागला! २५ ते ३० टक्क्यांनी वाढ

**दिल्ली :**– उन्हाळी सुट्टी सुरू होताच देशभरातील पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. याचा थेट परिणाम विमान प्रवासाच्या तिकीट दरांवर झाला असून, देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमान भाड्यात तब्बल २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. वाढती प्रवासी मागणी, इंधन दरवाढ आणि पर्यटन हंगाम यामुळे विमान कंपन्यांनी तिकीटदर वाढवल्याने प्रवाशांच्या खिशाला मोठी कात्री लागत आहे. विशेषतः गोवा, हिमाचल प्रदेश, काश्मीर, लेह–लडाख, उत्तराखंड आणि दक्षिण भारतातील पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या प्रवाशांना याचा मोठा फटका बसत आहे. उन्हाळ्याच्या वाढत्या उकाड्यामुळे महाराष्ट्रातील पर्यटक थंड हवेच्या ठिकाणी फिरण्यासाठी मोठ्या प्रमाणात बाहेर पडत आहेत. त्यामुळे विमानप्रवासाची मागणी वाढली आहे.

### द्रमुकचा लोकसभेत काँग्रेससोबत बसायला नकार

**नवी दिल्ली :**– इंडिया आघाडीतील महत्त्वाचा घटकपक्ष असलेल्या द्रमुकने मोठा निर्णय घेतला आहे. द्रमुकच्या नेत्या कनिमोळी यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र लिहून मोठी मागणी केली आहे. द्रमुकच्या या निर्णयाने इंडिया आघाडीला धक्का बसल्याचे पाहायला मिळते आहे. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत द्रमुक आणि काँग्रेसने एकत्र निवडणूक लढवली होती. मात्र, विधानसभा निवडणुकीत द्रमुकला पराभवाचा सामना करावा लागला, यानंतर काँग्रेसने थलपती विजय यांच्या टीव्हीके पक्षाला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे द्रमुक नाराज झाल्याचे पाहायला मिळत आहे. कनिमोळी यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना लिहिलेल्या पत्रात म्हटल की, द्रमुक खासदारांच्या लोकसभेतील बैठक व्यवस्थेत बदल करण्यात यावेत.

# तामिळनाडूत विजय यांचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा

## सीपीएम–सीपीआय आणि व्हीसीके देणार पाठिंबा

**चेन्नई । वृत्तसेवा**

तामिळनाडू विधानसभा निवडणूक २०२६ च्या निकालानंतर रंगलेल्या सत्तासंघर्षाला आता पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे. सुपरस्टार विजय यांच्या नेतृत्वाखालील तमिळगा वेत्री कझगम (टिव्हीके) हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला असला तरी, बहुमताच्या आकड्यापासून ते काहीसे दूर होते. मात्र, ताज्या सूत्रांनुसार, डावे पक्ष आणि विदुथलाई चिरूथईगल काची यांनी विजय यांना पाठिंबा देण्याची तयारी दर्शवल्याने त्यांच्या मुख्यमंत्रीपदाचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे.



तामिळनाडू विधानसभेच्या एकूण २३४ जागांपैकी विजय यांच्या टीव्हीके पक्षाने १०८ जागांवर विजय मिळवून दणदणीत कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे, विजय स्वतः दोन मतदारसंघांतून निवडून आले आहेत. नियमानुसार त्यांना एका जागेचा राजीनामा द्यावा लागणार असल्याने त्यांच्या पक्षाचे संख्याबळ १०७ होईल. एकूण आमदारांची संख्या २३३ गृहीत धरली तरी बहुमतासाठी ११८ या जादूई आकड्याची आवश्यकता आहे. टीव्हीकेला सध्या काँग्रेसच्या ५ आमदारांचा पाठिंबा आहे, तरीही बहुमतासाठी आणखी ६ जागांची उणीव भासत होती. राज्यातील सत्तापेच सोडवण्यासाठी आता लहान पक्षांनी पुढाकार घेतल्याचे दिसत आहे. निवडणुकीत सीपीएम, सीपीआय आणि व्हीसीके या तिन्ही पक्षांनी प्रत्येकी २ जागा जिंकल्या आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, या सहा आमदारांनी विजय यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. हा पाठिंबा मिळाल्यास टीव्हीकेप्रणित सरकारकडे आवश्यक असलेले ११८ चे संख्याबळ पूर्ण होणार आहे. यामुळे ५९ जागा जिंकणारा ◀◀ पान २ वर

# शुभेंदु अधिकारीच होणार पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री

## आज सकाळी ११ वाजता शपथविधी



**कोलकाता वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमधील सत्तास्थापनेचा पेच अखेर सुटला असून, भाजपचे ज्येष्ठ नेते शुभेंदु अधिकारी यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या निर्णयामुळे शुभेंदु अधिकारी हे पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री होणार असल्याचे आता निश्चित झाले असून, शनिवार, ९ मे रोजी सकाळी ११ वाजता त्यांचा भव्य शपथविधी सोहळा पार पडणार आहे.

कोलकाता येथे पार पडलेल्या भाजप आमदारांच्या बैठकीत शुभेंदु अधिकारी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा स्वतः निरीक्षक म्हणून उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीत सर्व आमदारांनी एकमताने अधिकारी यांच्या नेतृत्वाला पसंती दिली. पश्चिम बंगालमध्ये पहिल्यांदाच भाजपचे सरकार स्थापन होत असून, अधिकारी यांची निवड ऐतिहासिक मानली जात आहे. विधानसभा निवडणुकीत भाजपने दोन तृतीयांश पेक्षा जास्त जागा जिंकून दणदणीत बहुमत मिळवले आहे. राज्यात नवीन सरकार स्थापनेचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे. तत्पूर्वी, ७ मे रोजी पश्चिम बंगालच्या राज्यपालांनी १७ वी विधानसभा विसर्जित केली होती, ज्यासोबतच ममता बॅनर्जी यांचे सरकारही अधिकृतपणे बरखास्त झाले. ममता बॅनर्जी यांनी सुरुवातीला मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला होता, मात्र विधानसभेचा कार्यकाळ संपल्याने राज्यपालांनी घटनात्मक पाऊल उचलत विधानसभा बरखास्त केली. यामुळे आता शनिवारपासून बंगालमध्ये शुभेंदु अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली नवे पर्व सुरू होणार आहे.

# कोट्यावधीच्या महसूल घोटाळ्यातील जिल्हाधिकारी पाठकला सात दिवसांची कोठडी

**बीड । प्रतिनिधी**

बीड- धुळे सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनातील वाढीव मोबदल्याच्या १५४ प्रकरणात २४१ कोटी ६२ लाख रुपयांच्या घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना बीड पोलिसांनी गुरुवारी अटक केली. शुक्रवारी पाठक यांना बीड न्यायालयात हजर केले असता, त्यांना १५ मे पर्यंत म्हणजेच सात दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.




या प्रकरणात ७२ कोटी रुपयांचा वाढीव मोबदला वाटप करुन या प्रकरणातील कागदपत्रांमध्ये अविनाश पाठक यांच्या स्वाक्षरीबाबतचे अहवाल तपासल्यानंतर त्यांना चौकशीसाठी लातूरहून ताब्यात घेण्यात आले. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकाऱ्यास अटक होण्याची अलिकडच्या काळातील ही पहिलीच वेळ असल्याने खळबळ उडाली आहे. पण हा घोटाळा घडला कसा ? याचे तपशील कमालीचे रंजक आहेत. अविनाश पाठक यांची २२ एप्रिल २०२५ मध्ये बदली झाली. त्यांच्या जागी विवेक जॉन्सन रुजू झाले. नवे जिल्हाधिकारी रुजू झाल्यानंतरही अनेक प्रकरणात जुन्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सह्या होत आणि वाढीव मोबदल्याची प्रकरणे मंजूर होत. ही प्रक्रिया सलग पाच ते सहा महिने सुरू होती. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी अशा प्रकरणाची तपासणी केली. वाढीव मोबदल्याच्या लवाद प्रकरणात १७ एप्रिल २०२५ अशी तारीख नमूद करुन पाच महिने उशिरा भूसंपादनाच्या वाढीव मोबदला मंजूर झाल्याची प्रकरणे दाखल करण्यात आली. भूसंपादनाची ◀◀ पान २ वर

# कैद्यांच्या अडचणी दूर ; न्याय व्यवस्थेला मदत बीड जिल्ह्यात आणखी एका कारागृहाला मंजुरी

**बीड–अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील कैद्यांच्या वाढत्या संख्येचा आणि कारागृहावरील ताण लक्षात घेता, राज्य सरकारने अंबाजोगाई येथे नवीन जिल्हा कारागृह वर्ग–१ स्थापन करण्यास मंजुरी दिली आहे. या संदर्भातील अधिकृत




अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने ४ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केली असून, यामुळे जिल्ह्याच्या न्यायव्यवस्थेला मोठी मदत होणार आहे.

बीड शहरात आधीच जिल्हा कारागृह कार्यरत आहे. ◀◀ पान २ वर

### जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर करा–मुख्यमंत्री

**मुंबई । प्रतिनिधी**

एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण तसेच जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गतची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यात यावीत. तसेच भूजल पातळी कमी झालेल्या ठिकाणी प्राधान्याने कामे करून तेथील भूजल पातळी




वाढविण्यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस ◀◀ पान २ वर

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
**डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे**
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352



महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
- डोकेदुखी / अती चिंता व काळजी
  ➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता–पायात मुंग्या येणे)
- झोपेच्या समस्या
  ➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
- व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
- बालकांच्या समस्या :
  ➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
- स्मृती भंग (विसरभोळेपणा)
- लैंगिक समस्या
  ➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
- स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या



नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
सौ.संध्या श्रीराम टेकाळे(शिंदे) मुख्याध्यापिका मो.९४२१३४८४७४
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) मो.9075387638
सौ.डॉ.जयश्री रोहन मालुरे(टेकाळे) M.B.B.S. मो.७७४३९९०९८८ विठाई हॉस्पिटल,कळंब
डॉ.रोहन मालुरे M.B.B.S.,MD,Medicine विठाई हॉस्पिटल,कळंब मो.९८६०५६०५५७

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०६ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २२१.५० क्विंटल | २,१२५ | २,६०० | २,३१५ |
| ज्वारी/हायब्रिड : १४९.०० क्विंटल | १,८०१ | ३,८५१ | २,३०० |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ५.०० क्विंटल | ६,००० | ६,५०१ | ६,२५० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: १२६.५० क्विंटल | १,८३२ | २,५६२ | २,२४१ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

# गुजरात दंगलीप्रमाणे देशभर दंगली घडवण्याचे भाजपाचे षडयंत्र –सपकाळ

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतभरात दंगली घडवून आणण्याचे कारस्थान भारतीय जनता पक्षाकडून सुरु आहे, त्यासाठी प्रशिक्षण हाती घेतल्याची माहिती आहे. पाच राज्यातील निवडणुकांच्या निकालापासूनच धार्मिक तेढ निर्माण करण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. २००२ मध्ये गुजरातमध्ये जशा दंगली घडवून आणल्या होत्या, त्याच पद्धतीने देशभर दंगली करुन २०२९ च्या निवडणुका जिंकायच्या हे षडयंत्र आधीपासूनच रचले असून, विधानसभा निवडणुकीनंतर सुरु झालेल्या दंगली या त्याचे



पहिले पाऊल आहे, असा गंभीर आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी संवाद साधताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने पश्चिम बंगाल, आसामसह पाच राज्यातील निवडणुकीत हिंदू मुस्लीम द्वेष वाढवणारा अजेंडा चालवला, त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काहीच नाही कारण जनगणनेनंतर जानेवारी २०२८ मध्ये डिलिमिटेशनची प्रक्रिया सुरु होणार आहे. डिलिमिटेशनसाठी सुप्रीम कोर्टातील कोणत्या निवृत्त न्यायाधिशाला डिलिमिटेशन कमिटीत घ्यायचे हे सुनिश्चित झालेले आहे. डिलिमिटेशन नंतरचा ◀◀ पान २ वर

अग्रलेख

# लोकशाही : मोफत योजनांची राजकारणशाही आणि वाढता कर्जसापळा

लोकशाही आणि निवडणूक या एकाच नाण्याच्या दोन बाजू मानल्या जातात. लोकशाहीची खरी ताकद ही जनतेच्या विवेकपूर्ण मतदानात, विकासाभिमुख धोरणांत आणि उत्तरदायी शासनात असते. परंतु गेल्या काही दशकांमध्ये भारतीय निवडणूक प्रक्रियेचा प्रवास ज्या दिशेने होत आहे, तो पाहता लोकशाही हळूहळू धनशाही, लोकलाडावणूक आणि मोफत योजनांच्या राजकारणाकडे झुकताना दिसत आहे. मतदारांच्या दीर्घकालीन हितापेक्षा अल्पकालीन आर्थिक लाभ महत्त्वाचे ठरू लागले आहेत. परिणामी निवडणुका या विचार, धोरण आणि विकासाच्या स्पर्धा न राहता ''कोण अधिक मोफत देणार?'' याची स्पर्धा बनत चालल्या आहेत.

पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ, आसाम आणि पुदुचेरीच्या निवडणूक निकालांनी पुन्हा एकदा हा प्रश्न ऐरणीवर आणला आहे. या निवडणुकांमध्ये विकास, औद्योगिक गुंतवणूक, रोजगारनिर्मिती, प्रशासनिक सुधारणा यांसारख्या दीर्घकालीन मुद्यांपेक्षा जनतेला थेट आर्थिक लाभ देणाऱ्या योजनांचा प्रभाव अधिक ठळकपणे दिसून आला. गरीब कल्याणाच्या नावाखाली दिल्या जाणाऱ्या रोख मदतीच्या योजना, मोफत वीज, मोफत पाणी, अनुदानित धान्य, महिलांसाठी आर्थिक मदत, युवकांसाठी रोख प्रोत्साहन अशा योजना आता प्रत्येक राजकीय पक्षाच्या जाहीरनाम्याचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. या योजनांचा मूलभूत हेतू समाजातील दुर्बल घटकांना आधार देणे हा असला, तरी त्यांचा वापर निवडणूक जिंकण्याचे साधन म्हणून वाढत्या प्रमाणात होत आहे. राज्यघटनेतील मार्गदर्शक तत्त्वांनुसार गरिबी कमी करणे, सामाजिक न्याय प्रस्थापित करणे आणि दुर्बल घटकांना मदत करणे ही शासनाची जबाबदारी आहे. मात्र कल्याणकारी योजना आणि मतांसाठी केलेली आर्थिक लाच यामधील सीमारेषा दिवसेंदिवस धूसर होत चालली आहे. भारतातील अनेक राज्यांमध्ये या मोफत योजनांचे स्वरूप आता अत्यंत व्यापक झाले आहे. तामिळनाडूमध्ये मोफत तांदूळ, वीज आणि विद्यार्थ्यांना लॅपटॉप देण्याची परंपरा निर्माण झाली. दिल्लीमध्ये ठरावीक मर्यादेपर्यंत मोफत वीज आणि पाणी पुरवठा केला जातो. पंजाबमध्ये शेतकऱ्यांना मोफत वीज दिली जाते. महाराष्ट्रात ''मुख्यमंत्री लाडकी बहीण'' योजनेअंतर्गत महिलांना दरमहा आर्थिक मदत दिली जाते, तर शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी आणि वीज सवलतींचे धोरण राबवले जाते. पश्चिम बंगालमध्ये ''लक्ष्मी भंडार'', ''कन्याश्री'' आणि ''रूपाश्री'' यांसारख्या योजना मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय झाल्या. या योजनांचा राजकीय लाभ नाकारता येणार नाही. मतदारांना थेट आर्थिक मदत मिळाल्यामुळे अल्पावधीत सरकारविषयी सकारात्मक भावना निर्माण होते. गरीब कुटुंबांच्या तात्पुरत्या अडचणी दूर करण्यास अशा योजना काही प्रमाणात मदत करतात. परंतु प्रश्न असा आहे की, या योजनांसाठी लागणारा प्रचंड आर्थिक निधी राज्ये कुठून आणणार? विकासासाठी आवश्यक असलेली पायाभूत गुंतवणूक, शिक्षण, आरोग्य, उद्योग, सिंचन, रोजगारनिर्मिती यासाठीचा निधी कमी करून जर मोठ्या प्रमाणावर महसूल खर्च वाढवला गेला, तर त्याचे परिणाम भविष्यात गंभीर होणार हे निश्चित आहे. राज्य सरकारांचे उत्पन्न मर्यादित असते. त्यांना पायाभूत सुविधा उभारणे, प्रशासन चालवणे, सामाजिक सेवा पुरवणे आणि आर्थिक विकास साधणे यासाठी मोठा खर्च करावा लागतो. जेव्हा उत्पन्न अपुरे पडते तेव्हा राज्यांना कर्ज घ्यावे लागते. जर हे कर्ज रस्ते, उद्योग, सिंचन, वीज प्रकल्प, शिक्षण किंवा आरोग्य यांसारख्या उत्पादक क्षेत्रांमध्ये गुंतवले गेले, तर भविष्यात त्यातून उत्पन्न निर्माण होऊन कर्जफेड शक्य होते. परंतु मोफत योजनांसाठी घेतलेले कर्ज कोणतीही उत्पादक मालमत्ता निर्माण करत नाही. परिणामी कर्जाचा भार वाढत जातो आणि राज्ये कर्जसापळ्यात अडकण्याचा धोका निर्माण होतो.

रिझर्व्ह बँक आणि वित्तीय जबाबदारी कायद्यांनुसार राज्यांनी कर्जमर्यादा पाळणे अपेक्षित आहे. परंतु वास्तवात अनेक राज्यांचे कर्ज त्यांच्या उत्पन्नाच्या धोकादायक पातळीपर्यंत पोहोचले आहे. पंजाब, राजस्थान, पश्चिम बंगाल, बिहार, आंध्रप्रदेश, तमिळनाडू यांसारख्या राज्यांचे कर्ज प्रमाण झपाट्याने वाढत आहे. राज्य शासनांनी विविध महामंडळे आणि उद्योगांना दिलेल्या हमी कर्जांचा समावेश केला, तर ही परिस्थिती आणखी गंभीर दिसते. हिमाचल प्रदेशमध्ये आर्थिक अडचणी इतक्या वाढल्या की सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर देण्याबाबत प्रश्न निर्माण झाला. ही परिस्थिती केवळ एका राज्यापुरती मर्यादित नाही; ती संपूर्ण देशासाठी धोक्याची घंटा आहे. आज अनेक राज्ये महसुली तुटीने त्रस्त आहेत. कर्जफेड आणि व्याज देण्यासाठीच मोठा निधी खर्च होत आहे. त्यामुळे विकासकामांसाठी आवश्यक भांडवल कमी पडत आहे.

पश्चिम बंगालच्या निवडणुकीतही हेच चित्र दिसले. एका बाजूला आर्थिक विकास, औद्योगिकीकरण, रोजगार आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाचे आश्वासन देणारे राजकारण होते; तर दुसऱ्या बाजूला थेट आर्थिक मदतीच्या लोककल्याणकारी योजना होत्या. मतदारांनी कोणत्या गोष्टीला अधिक प्राधान्य दिले, हे निकालांनी स्पष्ट केले. परंतु या राजकीय यशामागे राज्याच्या वाढत्या कर्जाचा आणि आर्थिक ताणाचा मोठा प्रश्न दडलेला आहे. गेल्या काही वर्षांत पश्चिम बंगालचे कर्ज आठ लाख कोटी रुपयांच्या पुढे गेले आहे. महाराष्ट्रासारखे राज्य देखील आता त्याच मार्गावर चालताना दिसत आहे. मोफत योजनांचे आणखी एक गंभीर परिणाम म्हणजे समाजामध्ये परावलंबित्व वाढणे. शासनाने दिलेली मदत ही संकटाच्या काळात आधार देणारी असावी; परंतु ती कायमस्वरूपी जीवनशैली बनली, तर उत्पादनक्षम अर्थव्यवस्था कमकुवत होते. श्रम, कौशल्य, उद्योजकता आणि स्वावलंबन यांना प्रोत्साहन देण्याऐवजी जर मोफत लाभांच्या अपेक्षांवर समाज उभा राहिला, तर दीर्घकालीन आर्थिक प्रगती मंदावते. समाजातील एक मोठा वर्ग शासनाच्या मदतीवर अवलंबून राहू लागतो आणि उत्पादक अर्थव्यवस्थेचा पाया दुर्बल होतो. याचा अर्थ असा नाही की कल्याणकारी योजना पूर्णपणे चुकीच्या आहेत. दारिद्र्य, बेरोजगारी, ग्रामीण संकट, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक विषमता या वास्तव समस्या आहेत. अनेक वेळा तात्पुरती आर्थिक मदत आवश्यकही असते. परंतु ती मर्यादित, उद्देशपूर्ण आणि वित्तीयदृष्ट्या शाश्वत असणे आवश्यक आहे. योजनांचा केंद्रबिंदू हा लोकांना कायम मदतीवर ठेवण्याऐवजी त्यांना स्वावलंबी बनवणे हा असायला हवा. खरा विकास हा उद्योग, रोजगार, कौशल्यविकास, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांमधील गुंतवणुकीतून घडतो. रोजगारनिर्मिती करणारे उद्योगस्नेही धोरण, कृषी क्षेत्रातील मूल्यवृद्धी, तंत्रज्ञानाधारित अर्थव्यवस्था आणि उद्योजकतेला चालना देणारी व्यवस्था यामुळेच दारिद्र्य कमी होऊ शकते. यामुळे कल्याणकारी राज्य आणि वित्तीय शिस्त यामधील समतोल राखणे हाच आजच्या भारतीय लोकशाहीसमोरील सर्वात मोठा प्रश्न आहे.

# 'महाराजस्व समाधान शिबिरामध्ये' गरिबाला न्याय मिळाला-आयुक्त जी. श्रीकांत

## ७८ कुटुंबांना हक्काच्या घराचे पट्टा वाटप-जिल्हाधिकारी मित्तल



अंबड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' (टप्पा १)चे अत्यंत भव्य आणि यशस्वी आयोजन आज ८ मे २०२६ रोजी अंबड येथील मत्स्योदरी देवस्थान मंगल कार्यालय येथे पार पडले. शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकाच छताखाली देण्यासाठी आयोजित केलेल्या या शिबिरात अंबड शहर आणि १३ गावांमधील हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या ऐतिहासिक सोहळ्यास विभागीय आयुक्त जी. श्रीकांत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, रमेश मिसाळ नगराध्यक्षा देवयानी कुलकर्णी उपनगराध्यक्ष विश्वजीत खरात उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी तहसीलदार विजय चव्हाण,मुख्याधिकारी मनोज उकिर्डे, एसबीआय बँकेचे मॅनेजर कौशिक चौधरी यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महाराष्ट्रातील एकमेव आणि ऐतिहासिक निर्णय: भिल्ल बांधवांना पट्टे वाटप**

या शिबिराचे सर्वात मोठे आणि ऐतिहासिक वैशिष्ट्य म्हणजे, अंबड शहरातील एकलव्य नगर येथे अनेक वर्षांपासून अतिक्रमण करून वास्तव्यास असलेल्या भिल्ल जमातीच्या ७८ कुटुंबांना हक्काच्या घराचे पट्टे (जागेची मालकी) वाटप करण्यात आले. शासनाच्या २५ मार्च २०२६ च्या नव्या निर्णयानुसार राबवण्यात आलेला हा महाराष्ट्रातील अशा प्रकारचा एकमेव आणि पहिलाच पथदर्शी कार्यक्रम ठरला.

याबाबत बोलताना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले, ''पैसा असला तरी हवेत घर बांधता येत नाही, त्यासाठी जमिनीचा आधार लागतो. आज या वंचित घटकांना शासनाने तो आधार दिला आहे. मी जिल्हाधिकारी असताना जाचक अटींमुळे घरांचे हक्क देणे कठीण होते, मात्र आता मुख्यमंत्री आणि महसूल मंत्री यांनी घेतलेल्या निर्णयामुळे गोरगरिबांचे घराचे स्वप्न पूर्ण होत आहे.'' या लाभार्थ्यांना केवळ जागेचे पट्टेच नाही, तर घरकुल आणि ५ ब्रास मोफत वाळू देखील दिली जाणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा त्यांनी केली. तसेच, उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना पदाची गरिमा राखून कष्टाळू हातांची सेवा करण्याची जाणीव त्यांनी करून दिली.

**मान्यवरांचे मार्गदर्शन आणि प्रशासनाचे कौतुक**

आमदार नारायण कुचे शासनाच्या योजनांमुळे सर्वसामान्यांचा मोठा फायदा होत असल्याचे सांगत त्यांनी महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामाची मोठी प्रशंसा केली. उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, तहसीलदार विजय चव्हाण, कृषी अधिकारी बाळासाहेब गंडे आणि मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांच्या उत्कृष्ट नियोजनाचे त्यांनी तोंडभरून कौतुक केले. तथापि, भूमी अभिलेख विभागाच्या कारभारावर नाराजी व्यक्त करत, ग्रामीण भागात पट्टे वाटप करताना कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा पदाधिकाऱ्याने एका रुपयाचीही मागणी केल्यास गय केली जाणार नाही, असा सक्त इशारा त्यांनी दिला. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल महसूल विभागासह सर्वच यंत्रणा शासनाच्या योजना अत्यंत काटेकोरपणे तळागाळापर्यंत पोहोचवत असल्याबद्दल त्यांनी प्रशासनाचे कौतुक केले. भिल्ल समाजासाठी राबवलेला हा प्रयोग दिशादर्शक असून, भविष्यात ग्रामीण भागातही अशी अभियाने मोठ्या प्रमाणावर राबवली जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी यांनी प्रास्ताविकात या आठव्या शिबिराचा उद्देश स्पष्ट करत, शासनाच्या सर्व योजना एकाच छताखाली देण्याचा प्रशासनाचा हा प्रामाणिक प्रयत्न असल्याचे प्रतिपादन केले. केदार कुलकर्णी यांनी प्रशासनाचे आभार मानत अशा शिबिरांमुळे जनतेत सकारात्मक वातावरण तयार होत असल्याची भावना व्यक्त केली.

**शिबिरात वाटप करण्यात आलेले विविध लाभ**

शेतकरी व आपत्तीग्रस्त मदत नैसर्गिक आपत्ती (वीज पडणे) व शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना प्रत्येकी ४ लाख रुपयांच्या मदतीचे वाटप. महिला सक्षमीकरण नगरपालिकेच्या महिला बचत गटांना २ कोटी ७५ लाख रुपयांचे अनुदान आणि छोट्या घरकुलांच्या चाव्यांचे वाटप.

कृषी यांत्रिकीकरण ट्रॅक्टर, मिनी ट्रॅक्टर, फवारणी यंत्रे आणि अद्ययावत ड्रोनचे शेतकऱ्यांना वितरण.

विविध प्रमाणपत्रे व योजनामहसूल विभागाचे जन्म आदेश, ७/१२ उतारे, उत्पन्न प्रमाणपत्रे, आणि पुरवठा विभागामार्फत दिव्यांगांना अंत्योदय योजनेचा लाभ जागीच देण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वी करण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी उमाकांत पारधी व तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली महसूल, कृषी, नगरपालिका, भूमी अभिलेख (प्रवीण राठोड व टीम), पंचायत समिती आणि महिला व बाल विकास विभागाच्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. यामध्ये मंडळ अधिकारी कल्याण माने, तलाठी गणेश खरात यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन मंडळ अधिकारी संदीप नरुटे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विजय चव्हाण यांनी केले, निराधाराला आधार देणारे कार्यकर्ते नंदू पाटील, औदुंबर बागडे, नगरसेवक,सरपंच, एसबीआय मुख्य शाखा अधिकारी कौशिक चौधरी, प्रभारी गटविकास अधिकारी यांच्यासह सर्व नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, अव्वल कारकून व महसूल कर्मचाऱ्यांच्या योगदानाने हा सोहळा खऱ्या अर्थाने सुजलाम सुफलाम'' भारताचे स्वप्न साकार करणारा ठरला.

## विभागीय आयुक्त श्रीकांत, जिल्हाधिकारी मित्तल यांची विविध विकास कामाची पाहणी



जालना । प्रतिनिधी

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत हे आज जालना दौऱ्यावर आले असता, यावेळी त्यांनी जालना शहरातील विविध विकास कामांना प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली. यामध्ये त्यांनी मोतीबाग येथील नवीन चौपाटी सुशोभीकरणाच्या कामास भेट देवून पाहणी केली. तसेच सुपर फिफ्टी उपक्रमास भेट देवून संबंधीताकडून सदर उपक्रमाची माहिती जाणुन घेतली. यांनतर जालना ड्रायपोर्टला भेट देवून पाहणी करत, ड्रायपोर्ट कामाच्या प्रगतीबाबत माहिती घेतली. यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कंवरिया, मनपा आयुक्त अंजली शर्मा, रमेश मिसाळ, यांच्यासह संबंधीत विभाग प्रमुख होते

## निदा खानला एमआयएमचा आसरा; इम्तियाज जलील यांच्यासह नगरसेवकांची चौकशी करा – संजय शिरसाट

संभाजीनगर । प्रतिनिधी

नाशिकमधील बहुचर्चित असलेले टीसीएस धर्मांतर आणि लैंगिक शोषण प्रकरणातील मुख्य आरोपी निदा खानला गुरूवारी रात्री छत्रपती संभाजीनगर मधून अटक करण्यात आली. तिला एमआयएमच्या नगरसेवकाने आसरा दिल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. दरम्यान, मंत्री संजय शिरसाट यांनी एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांच्यासह त्यांच्या नगरसेवकांची चौकशी करावी अशी मागणी केली आहे.

पान १ वरून...

### भाडेपट्ट्याने शेत कसणाऱ्या

वाढवणे, ग्रामीण भागातील आर्थिक चक्राला गती देणे, तसेच शेतीमध्ये व्यावसायिक विविधतेला चालना देणे हा या अधिनियमामागील मुख्य उद्देश असल्याचे शासनाने नमूद केले आहे. विशेष म्हणजे, पट्ट्याने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना आता बँका आणि पतसंस्थांकडून अधिकृतरीत्या कर्ज मिळू शकणार आहे. तसेच पीक विमा, नैसर्गिक आपत्तीमधील नुकसानभरपाई, कृषी अनुदाने आणि विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांना कायदेशीर मान्यता मिळणार आहे. त्यामुळे शेती करणाऱ्या वास्तविक शेतकऱ्यांपर्यंत शासनाच्या योजना पोहोचण्यास मदत होणार असल्याचे सांगितले जात आहे.

शासनाने 'महाराष्ट्र शेतजमीन भाडेपट्ट्याने देण्याबाबत अधिनियम, २०१७' हा कायदा संमत करून तो २७ जून २०२३ पासून राज्यभर लागू केला आहे. त्यानंतर या अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी २ जून २०२५ रोजी 'महाराष्ट्र शेतजमीन भाडेपट्ट्याने देण्याबाबत नियम, २०२४' अधिसूचित करण्यात आले. आता या नियमांची जिल्हा, तालुका आणि क्षेत्रीय स्तरावर काटेकोर अंमलबजावणी व्हावी यासाठी महसूल विभागाने सर्व संबंधित अधिकाऱ्यांना सविस्तर सूचना दिल्या आहेत.

### कैद्यांच्या अडचणी दूर

मात्र, आता अंबाजोगाई तालुक्यात ५०० कैद्यांची क्षमता असलेले स्वतंत्र कारागृह उभारले जाणार आहे. महाराष्ट्र कारागृह आणि सुधार सेवा अधिनियम, २०२५ च्या तरतुदीनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. अंबाजोगाई कारागृहाची कैदी क्षमता ही ५०० कैद्यांची असणार असून, सुमारे ३० एकरमध्ये ते असणार आहे. मौजे काळवंटी, लमाण तांडा, ता. अंबाजोगाई, या ठिकाणी ते मंजूर करण्यात आले असून, शासनाने शुक्रवारी दिनांक ८ मे रोजी मंजुरीचे आदेश काढले आहेत. या नवीन कारागृहाच्या सीमा देखील निश्चित करण्यात आल्या आहेत. ३० एकरच्या विस्तीर्ण परिसरात हे कारागृह उभारले जाणार असल्याने कैद्यांसाठी आधुनिक सुविधा आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने हे कारागृह महत्त्वाचे ठरेल. बीड जिल्हा कारागृहावर असलेला कैद्यांचा भार कमी करण्यासाठी अंबाजोगाईचे हे नवीन कारागृह मैलाचा दगड ठरणार असून, लवकरच याच्या प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात होण्याची शक्यता आहे.

### तामिळनाडूत विजय यांचा

सत्ताधारी डीएमके आणि ४७ जागा जिंकणारा एआयडीएमके या दोन्ही प्रबळ पक्षांना आता विरोधी बाकांवर बसावे लागणार आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीपीएम, सीपीआय आणि व्हीसीके या तिन्ही पक्षांच्या नेत्यांची महत्त्वपूर्ण बैठक सध्या सुरू आहे. या बैठकीत पाठिंब्याच्या अटी आणि पुढील धोरणांवर चर्चा केली जात आहे. ही बैठक संपल्यानंतर लवकरच राज्यपालांची भेट घेऊन सत्तास्थापनेचा दावा केला जाऊ शकतो आणि त्यानंतरच अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे.

### कोट्यावधीच्या महसूल घोटाळ्यातील

मूळ रक्कम ६८ कोटी रुपये असताना वाढीव मंजूर मोबदला ३१० कोटी २० लाख रुपये दाखविण्यात आला. हा मंजूर मोबदला राष्ट्रीय महामार्गाच्या कार्यालयाकडून मिळाल्यानंतर त्यांनी ७२ कोटी रुपयांचे वितरणही करण्यात आले. या प्रकरणातील कागदपत्रातील अविनाश पाठक यांची स्वाक्षरी बनावट आहे की नाही याचा तपास करण्यासाठी हस्ताक्षर तज्ज्ञांची मदत घेण्यात आली. तसेच न्याय वैद्यक प्रयोगशाळेकडून आलेल्या अहवालानंतर अविनाश पाठक यांना चौकशीसाठी प्रश्नावली पाठविण्यात आली होती. या घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकारी पाठक यांचे नाव, पदनाम व स्वाक्षरी करून दि. १ मार्च २०२५ ते १७ एप्रिल २०२५ पर्यंतच्या १५४ बनावट आदेश निर्गमित करण्यात आले होते. यातील सर्व कागदपत्रे, दूरध्वनीवरील संभाषणासह, सर्व संचिका पोलिसांनी तपासल्यानंतर अविनाश पाठक यांना चौकशीसाठी ताब्यात घेऊन अटक करण्यात आली. न्यायालयामध्ये हजर केले असता सात दिवसाचे म्हणजेच १५ मे पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली.

### गुजरात दंगलीप्रमाणे देशभर

मतदार संघाचा नकाशाही तयार झालेला आहे, असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. तामिळनाडूतील राजकीय घडामोडींवर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, तामिळनाडूत निवडणुकीनंतर उद्धवलेल्या परिस्थितीत जोसेफ विजय यांच्या पक्षाला पाठिंबा देण्याचा निर्णय हा स्थानिक नेते, प्रभारी यांनी सर्वांशी विचारविनिमय करुनच पक्षश्रेष्ठींनी घेतलेला आहे. टीव्हीके पक्षाबरोबर निवडणुकीपूर्वीच आघाडी करावी अशी स्थानिक नेते व कार्यकर्त्यांची मागणी होती, त्यावेळीच तसा निर्णय घेतला असता तर काँग्रेस पक्षाचे जास्त आमदारही निवडून आले असते पण लोकशाही व संविधान वाचवण्यासाठी लढा देणाऱ्या पक्षाबरोबर आघाडी करण्यास काँग्रेस कटिबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले.

### जलसंधारणाची कामे

यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी मृद व जलसंधारण विभागाचा आढावा घेतला. यावेळी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे जल विषयक सल्लागार श्रीराम वेदिरे, विशेष कार्य अधिकारी प्रिया खान, मृद व जलसंधारण आयुक्त अंजली रमेश, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय देवराज आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एल निनोच्या पार्श्वभूमीवर भूजल पातळी वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी जलसंधारण, जलयुक्त शिवारमधील कामांचे प्राधान्य ठरवून ती पूर्ण करण्यात यावीत. तसेच जलयुक्त शिवार २.० अंतर्गत समाविष्ट गावांमध्ये दुरुस्तींच्या कामांची निकड पाहून ही कामे आराखड्यात समाविष्ट करून तातडीने पूर्ण करावीत. जलयुक्तमधील राज्यस्तरीय आराखडे १५ मे पूर्वी मंजूर करण्यात यावेत. तसेच जिल्ह्यांना सुधारित आराखडे देऊन कामांना गती द्यावी. जलयुक्त शिवारची कामे हाती घेतलेल्या गावांबाहेरील १० टक्के कामेही प्राधान्यक्रम ठरवून हाती घेण्यात यावीत. मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, केंद्र शासनाच्या 'विकसित भारत जी राम जी' योजनेमध्ये जलसंधारणाच्या कामांवर भर देण्यात आला आहे. त्याचा लाभ घेऊन राज्यातील जलसंधारणाची कामे पूर्ण करून घ्यावीत. जलसंधारण कामाअंतर्गत नाला खोलीकरणची कामे करताना त्याठिकाणी पुन्हा गाळ होऊ नये, यासाठी नाल्याच्या ठिकाणी बांबू लागवड करण्याचा विचार करावा, असे सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस शेवटी म्हणाले की, पंतप्रधान कृषी सिंचन योजनेअंतर्गत आतापर्यंत २२ हजार कामे पूर्ण झाली असून, त्यांचे जिओ टॅगिंग करण्यात आले आहे. तसेच पाणलोट विकास घटकांतर्गत ५७ अमृत सरोवर तयार करण्यात येत असून १५ जूनपर्यंत ३१ अमृत सरोवर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. विभागाच्या पाच वर्षांच्या बृहद आराखड्याअंतर्गत राज्यातील २७ हजार ९४२ सूक्ष्म पाणलोटांमध्ये १ लाख २१ हजार ५८३ कामे प्रस्तावित करण्यात आली असल्याचेही यावेळी सांगितले.

पान ६ वरून...

### आष्टी शहरात धूम स्टाईल

महिलांना सतर्कतेचे आवाहन

दरम्यान, नागरिकांकडून महिलांनी एकट्याने प्रवास करताना सतर्क राहावे, गर्दीच्या ठिकाणी मौल्यवान दागिने उघडपणे न घालण्याची काळजी घ्यावी, तसेच संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. आता या वाढत्या धूम स्टाईल चोरीच्या घटनांचा पोलिस प्रशासन कितपत गांभीर्याने विचार करून कारवाई करते, याकडे संपूर्ण आष्टी शहराचे लक्ष लागले आहे.

### परळी आणि बर्दापूरच्या

पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, श्रीमती चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यात परळी ग्रामीणचे पो.नि. मझहर सय्यद, सपोनि सदानंद मेंडके आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

### स्थानिक गुन्हे शाखेची मोठी

कबुली दिली. चोरी केलेला टेम्पो त्यांनी धारूर येथील एम.आय.डी.सी परिसरात लपवून ठेवला होता. पोलिसांनी तो टेम्पो जप्त केला असून दोन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी केज पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. हे दोन्ही आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वीही चोरी आणि जबरी चोरीचे गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक आणि अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, पोउपनि महेश विघ्ने, बप्पासाहेब घोडके, जफर पठाण, महेश जोगदंड, दिलीप गित्ते आणि गणेश मराडे यांच्या पथकाने केली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या या तत्पर कामगिरीचे परिसरात कौतुक होत आहे.

### योगेश्वरीच्या महिला

यासाठी शिबीरे गरजेचे आहेत. बदलत्या जीवन शैलीमुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ न देता ती उर्जा निर्माण करून समाजाच्या उपयोगी पडण्यासाठी विद्यार्थिनींनी पुढाकार घ्यावा असेही त्या म्हणाल्या. शिबिराबाबत आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात चौसाळकर म्हणाले की,योगेश्वरी शिक्षण संस्था घेत असलेले महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीर मुलींसाठी महत्वाचे असून यामुळे शारिरीक क्षमता वृद्धींगत होते.शिबीरात झालेल्या विविध क्रिडा प्रकारांचा विद्यार्थिनींनी सराव वर्षभर करावा म्हणजे त्याचा उपयोग भावी काळात होईल. शिबीरार्थी मुलींनी योगासने,काठी-लाठी, तलवारबाजी,कराटे इत्यादी वेगवेगळे प्रात्यक्षिके करून दाखवले. उपस्थित पाहुण्यांचे तसेच शिबीरातील विविध प्रशिक्षक,योगशिक्षक यांचे स्वागत संस्थेच्या वतीने करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.पी.एस.देशमुख यांनी केले.तर डॉ.रशिदा शेख यांनी संचालन केले.यावेळी संस्थेचे पदाधिकारी, संचालक,विविध विभागाचे प्रमुख,शिक्षक, प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी पालक उपस्थित होते.

### जवाहर विद्यालयाची

परंपरा कायम राखली आहे.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल नवविकास मंडळाचे अध्यक्ष ॲड.एस.आर.शर्मा, कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख, उपाध्यक्ष ॲड.आर.डी.भिलेगावकर, सहकार्यवाह आर.बी.देशमुख,संचालक तथा शालेय समितीचे अध्यक्ष शिरीष देशमुख, संचालक तथा नगरसेवक डॉ.सचिन देशमुख, राहुल मुळी, मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते, पर्यवेक्षक मोरेश्वर मसलेकर यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

### धर्माचा प्रसार केंद्र असलेली

दान उद्देशाच्या विरोधात असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

हरकतीमध्ये भारतीय राज्यघटनेतील कलम २५ आणि २६ चा उल्लेख करत धार्मिक संस्थांच्या मालमत्ता व धार्मिक व्यवस्थापनाच्या घटनात्मक अधिकारांवरही या कायद्यामुळे परिणाम होऊ शकतो, असे नमूद करण्यात आले आहे. सपकाळ यांनी शासनाकडे ''महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम, २०२६'' हा प्रस्तावित कायदा तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. तसेच देवस्थानांच्या जमिनींचे संरक्षण, डिजिटल अभिलेखीकरण, अतिक्रमण हटविणे, पारदर्शक व्यवस्थापन आणि उत्पन्नवाढीसाठी स्वतंत्र धोरण राबविण्याची मागणीही करण्यात आली आहे. कोणताही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी राज्यभरातील देवस्थान ट्रस्ट, पुजारी, भाविक, धार्मिक संस्था आणि नागरिकांची सार्वजनिक सुनावणी घेण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, या हरकतीमुळे देवस्थान इनाम जमिनींचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला असून राज्यभरातील विविध देवस्थान ट्रस्ट, धार्मिक संस्था व भाविकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. सरकारने हा घेतलेला निर्णय रद्द करावा यासाठी मोठे आंदोलन उभे राहणार आहे

### राज्यस्तरीय वक्तृत्व

प्रसंगी बोलताना डॉ. आदिती सारडा म्हणाल्या की, विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे ही आमच्या संस्थेची परंपरा आहे. ऋषिकेशने राज्यस्तरावर मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिपक पवार यांनीही ऋषिकेशचे कौतुक करत विद्यापीठाचे आभार मानले. केवळ शैक्षणिकच नव्हे, तर सांस्कृतिक आणि अवांतर क्षेत्रातही विद्यार्थी चमकत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. ऋषिकेशच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यातून आणि शैक्षणिक वर्तुळातून त्याचे अभिनंदन होत आहे.

### राजस्थानी सेवा समाज

तपासणी केली व त्यांनी तो २२(२) चा अर्ज दप्तरी जमा केला. त्याबदल अर्जाअधारे एडवोकेट गोविंद कासट यांनी ४१/ अ खाली सहाय्यक धर्मादाय यांचे कडे अर्ज केला. त्यामुळे घाबरून संबंधित संचालक मंडळींनी निवडणुकीची मागणी केली ही मागणी पाहता संबंधित संचालक मंडळींनी बोगस बदल अर्ज दाखल केला. तसेच दि.१०/०६/ २०२५ रोजी मीटिंग बोलावली होती त्यादिवशी ४१ सभासद हजर होते त्यात गोविंदप्रसाद मुंदडा यांचे अध्यक्षतेखाली मीटिंग घेण्यात आली व तसा बदल अर्ज अमर डागा यांनी सहाय्यक धर्मादाय यांचे कार्यालयात दाखल केला त्यातही २२(२) खाली अमर डागा यांनी अर्ज केला होता सहाय्यक धर्मादाय साहेब यांनी तो अर्ज दप्तरी जमा केला. त्यामुळे संस्थेवर अधिकृत काम पाहण्यासाठी कोणी नसल्याने अमर डागा यांनी माननीय सहायक धर्मादाय यांच्याकडे तीन सदस्यीय लोकांची कमिटी स्थापन करावी असा अर्ज दाखल केला त्यास माननीय सहायक धर्मादाय आयुक्त श्री चौधरी साहेब यांनी मान्यता देऊन श्नी. बोंडे साहेब इन्स्पेक्टर सहाय्यक धर्मादाय आयुक्त, श्नी. अमर डागा, विष्णुदास तापडिया या तीन लोकांची संस्थेचा कारभार पाहण्यासाठी प्रशासकपदी नियुक्ती केली व दि.०७/ ०५/ २०२६ पासूनच काम करण्यास परवानगी दिली.

## जवाहर विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

माजलगाव : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत केसापुरी वसाहत येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ८०.१३ टक्के लागला असून स्नेहा नितीन साळवे १०० टक्के, विद्या गणेश सोळंके ९९.४० टक्के,प्रतिक रामराव पवार ९५ टक्के, उत्कर्षा उत्तम वाले ९२.२० टक्के, ज्ञानेश्वरी कल्याण जगताप ९२ टक्के असे गुण घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल नवविकास मंडळाचे अध्यक्ष ॲड.एस.आर.शर्मा, कार्यवाह माजी शिक्षक आमदार डी.के.देशमुख, उपाध्यक्ष ॲड.आर.डी.भिलेगावकर, सहकार्यवाह आर.बी.देशमुख,संचालक तथा शालेय समितीचे अध्यक्ष शिरीष देशमुख, संचालक तथा नगरसेवक डॉ.सचिन देशमुख, राहुल मुळी, मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते, पर्यवेक्षक मोरेश्वर मसलेकर यांनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# आष्टी तालुक्याचा दहावी निकाल गुणवत्तेचा नवा मापदंड; सात विद्यालयांचा १०० टक्के निकाल

## ग्रामीण शिक्षण व्यवस्थेची दमदार घोडदौड; शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या विद्यालयांनी सिद्ध केली गुणवत्ता

आष्टी । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील शिक्षण केवळ टिकून नाही तर गुणवत्तेच्या बळावर राज्यातील स्पर्धेत सक्षमपणे उभे राहत असल्याचे चित्र यंदाच्या दहावीच्या निकालातून स्पष्ट झाले आहे. फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून आष्टी तालुक्यातील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ व भगिनी शिक्षण संस्थेच्या विद्यालयांनी उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.यंदाच्या निकालात तब्बल सात विद्यालयांनी १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवत ग्रामीण शिक्षण व्यवस्थेची ताकद दाखवून दिली. केवळ गुणांचा टक्का नव्हे, तर विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली स्पर्धात्मक मानसिकता, शिक्षकांची जिद्द आणि पालकांचा विश्वास यामुळे हे यश अधिक महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

आजच्या बदलत्या शैक्षणिक युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी कोणत्याही बाबतीत कमी नसल्याचे या निकालाने अधोरेखित केले आहे. अत्याधुनिक सुविधा नसतानाही विद्यार्थ्यांनी जिद्द, सातत्य आणि अभ्यासाच्या जोरावर घवघवीत यश मिळवत शहरी भागालाही मागे



टाकण्याची क्षमता असल्याचे दाखवून दिले आहे. सात विद्यालयांची शंभर टक्के यशाची पताका यंदा खालील सात विद्यालयांनी १०० टक्के निकाल नोंदवत संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेचा झेंडा उंचावला आहे पंडित नेहरू माध्यमिक विद्यालय, आष्टी ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय, देऊळगाव घाट अहिल्यादेवी विद्यालय, टाकळी आमिया शृंगेरी विद्यालय, ब्रह्मगाव निजाम पटेल विद्यालय, मेहेकरी कानडी खुर्द महेश माध्यमिक विद्यालय, रूई नालकोल पाटोदा उर्दू हायस्कूल, पाटोदा या विद्यालयांनी केवळ निकालाची टक्केवारी वाढवली नाही, तर शिक्षणात सातत्यपूर्ण गुणवत्ता राखण्याची परंपराही जपली आहे.

९० टक्क्यांवरील निकालांनी वाढवला शैक्षणिक आत्मविश्वास अनेक विद्यालयांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक निकाल मिळवत तालुक्याच्या शैक्षणिक प्रगतीत भरीव योगदान दिले आहे. अश्वलिंग विद्यालय पिपळवंडी, कानिफनाथ विद्यालय निमगाव चोभा, यशवंतराव होळकर विद्यालय शिरूर यांनी ९७ टक्के निकाल मिळवत गुणवत्ता सिद्ध केली. जय भवानी विद्यालय जळगाव, पांडुरंग विद्यालय नांदूर, मच्छिंद्रनाथ विद्यालय सावरगाव यांनी ९६ टक्के निकालाची नोंद केली. हरिनारायण स्वामी विद्यालय क-हेवाडीने ९५ टक्के, तर श्रीकृष्ण विद्यालय मातकुळी आणि जोतिलिंग विद्यालय कानडी बु. यांनी ९३ टक्के निकाल मिळवला. विठ्ठल विद्यालय निमगाव बोडखा, श्रीराम विद्यालय कडा यांनी ९२ टक्के, तर आष्टी पब्लिक स्कूल, भगतसिंग विद्यालय किन्ही, पिंपळेश्वर विद्यालय पिंपळा आणि सुदर्शन विद्यालय सांगवी पाटण यांनी ९१ टक्के निकाल मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. ग्रामीण शिक्षण व्यवस्थेचा वाढता दर्जा ग्रामीण भागात शिक्षणाची गुणवत्ता घसरत असल्याची टीका अनेकदा केली जाते; मात्र आष्टी तालुक्यातील निकालाने हे चित्र पूर्णपणे बदलून टाकले आहे. अनेक गावांमधील साध्या परिस्थितीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मोठे यश संपादन केले आहे. शिक्षकांचे नियोजन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांची शिक्षणाविषयी वाढती जागरूकता यामुळे तालुक्यात शैक्षणिक वातावरण अधिक सक्षम होत असल्याचे दिसत आहे. विशेष म्हणजे इंग्रजी माध्यम, शहरातील मोठ्या सुविधा किंवा कोचिंग क्लासेसशिवायही ग्रामीण विद्यार्थी उच्च निकाल मिळवत आहेत, ही बाब शिक्षण क्षेत्रासाठी आशादायी मानली जात आहे.

संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून अभिनंदन या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षणमहर्षी माजी आमदार भीमराव धोंडे, संचालक अजय धोंडे, अभय धोंडे, प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, माऊली बोडखे, संजय शेंडे, सागर वाघुले, संदीप नन्नवरे तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तालुक्यातील या निकालामुळे शिक्षण क्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून आगामी काळात आणखी गुणवंत विद्यार्थी घडण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## युसूफवडगाव विद्यालयाचा एसएससी. परीक्षेचा ९१.०९ टक्के निकाल



युसूफवडगांव। प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगाव येथील युसुफ वडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय युसुफ वडगाव चा एस.एस.सी .परीक्षा फेब्रुवारी /मार्च २०२६ चा निकाल आज घोषित झाला असून,विद्यालयाचा निकाल ९१.०९% एवढा लागला आहे.

यामध्ये एकूण प्रविष्ट विद्यार्थी १४६,विशेष प्राविण्याने उत्तीर्ण ६०,प्रथम श्रेणीने उत्तीर्ण ४९,द्वितीय श्रेणीने उत्तीर्ण २१,तृतीय श्रेणीने उत्तीर्ण ०३,असे एकूण १३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.त्यात ९०% पेक्षा जास्त गुण घेणारे १० विद्यार्थी आहेत.१) कु.भूमकर आरती सोमनाथ (९६.८०%) २) कु.निगडीकर प्रांजली गणेश (९६.२०%) ३) कु.ढोबळे अपेक्षा अशोक (९४.००%)४) कु.चव्हाण सिद्धी ज्ञानेश्वर (९३.६०%)५) कु.सावंत प्राची सुरेश (९१.८०%)६) कु.मुकदम तनिष्का गुरुलिंग (९१.४०%) ७) कु.इंगळे शुभांगी युवराज (९१.४०%) ८) कु.राऊत चैताली चंद्रकांत (९०.८०% )९) कु.मोरे काव्य सुदीप (९०.४०%)१०) चि.शेंडगे यश संपतराव (९०.२०%) एकूण गुणवत्तेत पण मुलींनीच बाजी मारलेली आहे. यशस्वी व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्था सचिव श्री.दीपक दादा घुमरे,संस्थाध्यक्ष श्री.सुकाळे यु.बी,विद्यालयाचे प्राचार्य श्री.भोसले ए.यु,पर्यवेक्षक श्री.शेख एम.बी,उच्च माध्यमिक विभाग प्रमुख श्री.चव्हाण एन .एन,विद्यालयाचे श्री.घुमरे प्रदीप,दहावी बोर्डाचे केंद्र संचालक श्री.मुकदम बी.एस,सहकेंद्र संचालक श्री.गडकर बी.एम,शिक्षक,प्राध्यापक,पालक, नागरिकांनी हार्दिक अभिनंदन केले असून,पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## शालांत परीक्षेत गोदावरी कुंकूलोळ कन्या विद्यालयाचे घवघवीत यश



अंबाजोगाई। प्रतिनिधी

मार्च २०२६ शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गो.कु.यो.कन्या विद्यालयाचा एकूण निकाल ९९.०६ टक्के इतका लागला असून विद्यालयातील विद्यार्थिनींनी घवघवीत यश प्राप्त केले असून विद्यालयातील ३२२ विद्यार्थिनी परीक्षेसाठी प्रविष्ठ झाल्या त्यातील ३१९ यश प्राप्त केले आहे.विशेष प्राविण्यासह१९९,प्रथमश्रेणी ९१ व्दितीय श्रेणी १९ विद्यार्थिनी आहेत या सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन यो.शि.संस्थेचे पदाधिकारी,संचालक , प्रमुख,शिक्षिका,शिक्षक,शिक्षिकेत्तर कर्मचारी, पालक आदींनी केले आहे.

# एलसीबीचा राममोहन प्यारे कलेक्शन किंग आणि पोलीसमित्र गुटखा किंग?

पाथर्डी । प्रतिनिधी

अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग एलसीबी विभागातील कार्यरत असणारे कर्मचारी राममोहनप्यारे (टोपण नाव) सर्रासपणे पाथर्डी तालुक्यातील चालणाऱ्या अवैध धंद्यावाल्यांकडून लाखो रुपयांची हप्तेखोरी करत आहेत त्यांना हप्ते पुरवणारा स्वयंघोषित पोलीसमित्र आहे जो राममोहनप्यारे याना प्रत्येक महिन्याला लाखो रुपयांचा हप्ता गोळा करून ऑनलाईन आणि रोख स्वरूपात पैसे जमा करून देतो तो स्वतः पोलीसमित्र असल्याचे बतावणी करतो पाथर्डी पोलीस ठाण्यातील कर्मचारी स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागातील कर्मचारी याच्याशी त्याचे हितसंबंध असल्याने तो पोलीसमित्र स्वतः अवैध धंदे करतो पाथर्डी तालुक्यात गुटखा पुरवणारा गुटखा माफिया व पोलीसमित्र म्हणून त्याची ओळख सांगून स्वतः गुटखा माफिया असून गुन्हेगारी स्वरूपाचा असून स्थानिक पोलीस प्रशासनाच्या अगदी नजरेसमोर असून गुटखा माफिया किंगवर कारवाई का होत नाही हा प्रश्न आहे जुगार मटके वाळू गुटखा मावा दारूचे हातभट्टी चालवणारे अड्डे गांजा इत्यादी बेकायदेशीर धंदे जे करतात त्यांच्याशी या पोलीसमित्र उर्फ गुटखा माफिया किंग व राममोहनप्यारे यांचे आर्थिक हितसंबंध आहेत प्रत्येक महिन्याच्या चार किंवा पाच तारखेला हे पाथर्डी तालुक्यात खाजगी वाहनाने व सिव्हिल ड्रेसवर येतात आणि अवैध धंदे करणारे सर्वांकडून हप्ते वसूल करतात स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागातील कार्यरत राममोहनप्यारे हे अवैध धंदे करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्याच्या ऐवजी गुन्हेगारीचे अर्थकारण करत आहे.

कायद्याचे रक्षण करणारे गुन्हेगारीला आळा घालणारे रक्षक हे गुन्हेगाराचे व गुन्हेगारीचे थेट समर्थन करत असल्याने अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग एलसीबी विभागाच्या कार्यपद्धतीवर शिंतोडे उडत असल्याने हप्तेखोरी करून शासनाची व पोलीस प्रशासनाची दिशाभूल करून स्वतःची करोडो रुपयांची माया राममोहनप्यारे जमा करत आहे यामुळे एसपी ममूक्का सुदर्शन यांच्याकडून एलसीबी विभागातील अवैध धंदेवाल्यांचां तारणहार व कलेक्शन किंग समजला जाणारा राममोहनप्यारे आणि त्याचा खास पंटर पोलीसमित्र तथा गुटखा माफिया किंग याची सत्ता खालसा करण्यासाठी ठोस पावले उचलावीत अशी अपेक्षा आहे.

## स्वाती ज्ञानेश्वर महानोरचे दहावी परीक्षेत यश



बीड / प्रतिनिधी: गेवराई तालुक्यातील शेकटा येथील राजमाता जिजाउ माध्यमिक विद्यालयात शिकत असलेल्या स्वाती ज्ञानेश्वर महानोर या शेतकऱ्याच्या मुलीने दहावी बोर्डाच्या परीक्षेमध्ये एकही मार्कची कॉपी न करता ७८.६० टक्के मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.

दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल दि. ८ मे रोजी जाहीर करण्यात आला असून गेवराई तालुक्यातील राजमाता जिजाऊ माध्यमिक विद्यालयाचा निकाल ८८.८ टक्के लागला आहे. यामध्ये स्वाती ज्ञानेश्वर महानोर या विद्यार्थिनीने ७८.६० टक्के मिळवून शाळमधून तिसरा क्रमांक मिळवून यश संपादन केले आहे. स्वाती महानोर ने शाळा संपल्यानंतर शेतात काम करून परीक्षेमध्ये एकही मार्कची कॉपी न करता हे यश संपादन केल्याल्यामुळे शाळेतील सर्व शिक्षक व गावातील प्रतिष्ठीत नागरिकांकडून तिचे कौतूक केले जात आहे.


## राजस्थानी माध्यमिक विद्यालयाचा ९८ टक्के निकाल

माजलगाव। प्रतिनिधी

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी २०२६ मध्ये माहेश्वरी शिक्षण प्रसारक संस्था संचलित राजस्थानी माध्यमिक विद्यालय या माजलगाव शहरातील नामांकित शाळेने आपली उत्कृष्ट यशाची परंपरा यावर्षी देखील कायम ठेवली आहे. दहावी बोर्ड परिक्षेत शाळेचा एकूण ९८ टक्के निकाल लागला आहे.या वर्षी एकूण १८१ विद्यार्थी शाळेतुन बोर्ड परीक्षेला बसले होते.त्यापैकी ५१ विद्यार्थी विशेष प्रावीण्यासह उत्तीर्ण झाले आहेत.७६ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

ऋषिकेश बजरंग कुमावत या विद्यार्थ्यांने ९४.६०% गुण मिळवून शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर राधिका पुरुषोत्तम पवार (९४.२०%), अनिकेत संजय शिंदे (९२.४०%) आणि ईश्वरी विजय शेजुळ (९०.२०%) यांनी अनुक्रमे द्वितीय, तृतीय आणि चौथा क्रमांक मिळवला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आर.जी.बजाज,सचिव रामानंद लड्डा,कोषाध्यक्ष रमेश कासट,उपाध्यक्ष ओमप्रकाश मानधने,सहसचिव राजेद्रं करवा,जे सी झंवर,बाळू झंवर,डॉ.डी जी इंदानी,राधेशाम जेथलिया,सर्व संचालक मंडळ, मुख्याध्यापक श्री. चंद्रशेखर तौर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

## बुखारी उर्दू माध्यमिक विद्यालयाचा ८४.९६ टक्के निकाल



माजलगाव। प्रतिनिधी

येथील बुखारी उर्दू माध्यमिक विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची यशस्वी परंपरा कायम राखत शालांत परीक्षा फेब्रुवारी २०२६ मध्ये मंडळा मार्फत घेण्यात आलेल्या दहावी बोर्ड परीक्षेत

प्रथम क्रमांकावर मिर्जा अदीबा जावेद ८६.८० % द्वितीय क्रमांकावर अत्तार फातेमा युसूफ ८६.४० % तृतीय क्रमांकावर शेख इस्लाह खाजा ८२ % चौथ्या क्रमांकावर शेख आयशा निसार ८०.२०% व तसेच मुलांमध्ये सर्वप्रथम शेख अनस अहेमद ७५.८०% द्वितीय क्रमांक सय्यद उमेर राजू ७४.८० % व सिद्दीकी जव्वाद शफीक याने ७४.८० % गुण प्राप्त केले या यशाबद्दल बुखारी उर्दू एज्युकेशनल संस्थेचे सचिव खुर्शीद नाईक,संस्थेचे अध्यक्ष अझहर नाईक,सहसचिव इम्रान नाईक व मुख्याध्यापक शेख हारून बशीरोद्दीन व सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय (दंड–विभाग)

ता. आष्टी जि. बीड
Email id-tahsildarashti@gmail.com
दूरध्वनी. क्र.. (०२४४१) २८२५४२
क्र.२०२६/दंड. विभाग/जन्म–मृत्यू/कावी–
दि. ३०/०४/२०२६

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये – सर्व जनतेस मौजे आष्टी ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि. अर्जदार, नामे, अजिज नवाब बेग – रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड यांनी त्यांचे नामे, आलिया अजित बेग रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड याची जन्म/मृत्यू दि. १७/१०/२००५ रोजी मोजे. आष्टी ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची मुलगी यांचे कायदेशीर जन्म/मृत्यू दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ३०/०४/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत /–
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी**

### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय (दंड–विभाग)

ता. आष्टी जि. बीड
Email id-tahsildarashti@gmail.com
दूरध्वनी. क्र.. (०२४४१) २८२५४२
क्र.२०२६/दंड. विभाग/जन्म–मृत्यू/कावी–
दि. ३०/०४/२०२६

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये – सर्व जनतेस मौजे आष्टी ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि. अर्जदार, नामे, अजिज नवाब बेग – रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड यांनी त्यांचे नामे, आदिन अजित बेग रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड याची जन्म/मृत्यू दि. ०६/११/२०१४ रोजी मोजे. आष्टी ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची मुलगी यांचे कायदेशीर जन्म/मृत्यू दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ३०/०४/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत /–
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी**

### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय (दंड–विभाग)

ता. आष्टी जि. बीड
Email id-tahsildarashti@gmail.com
दूरध्वनी. क्र.. (०२४४१) २८२५४२
क्र.२०२६/दंड. विभाग/जन्म–मृत्यू/कावी–
दि. ३०/०४/२०२६

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये – सर्व जनतेस मौजे आष्टी ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि. अर्जदार, नामे, अजिज नवाब बेग – रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड यांनी त्यांचे नामे, आर्शिया अजित बेग रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड याची जन्म/मृत्यू दि. १६/०८/२०१३ रोजी मोजे. आष्टी ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची मुलगी यांचे कायदेशीर जन्म/मृत्यू दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ३०/०४/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत /–
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी**

### कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय (दंड–विभाग)

ता. आष्टी जि. बीड
Email id-tahsildarashti@gmail.com
दूरध्वनी. क्र.. (०२४४१) २८२५४२
क्र.२०२६/दंड. विभाग/जन्म–मृत्यू/कावी–
दि. ३०/०४/२०२६

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये – सर्व जनतेस मौजे आष्टी ता. आष्टी. जि. बीड यांना जाहीर केले जाते कि. अर्जदार, नामे, अजिज नवाब बेग – रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड यांनी त्यांचे नामे, अदनान अजित बेग रा. आष्टी ता. आष्टी जि.बीड याची जन्म/मृत्यू दि. ०९/०७/२००७ रोजी मोजे. आष्टी ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म ची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे यांची मुलगा यांचे कायदेशीर जन्म/मृत्यू दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ३०/०४/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत /–
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी**

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार दि.९ मे २०२६


# शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी भाजीपाला आणि फळ निर्यातीवर भर देण्याची गरज - कृषिमंत्री चौहान

लखनौ / वृत्तसंस्था

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी भाजीपाला आणि फळांच्या निर्यातीत वाढ करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी केले. उत्तरप्रदेश येथील लखनौ येथे आयोजित कार्यक्रमादरम्यान कृषिमंत्री पत्रकारांशी बोलत होते.

यावेळी कृषिमंत्री चौहान म्हणाले की, ''फळ उत्पादन वाढवणे, गुणवत्ता सुधारणे आणि प्रक्रिया पायाभूत सुविधा मजबूत करणे या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी, रोजगार निर्मितीसाठी आणि परकीय चलन मिळवण्यासाठी निर्यातीत वाढ करण्याची गरज आहे.'' असे त्यांनी सांगितले. भारत अनेक प्रकारच्या फळांच्या उत्पादनात आघाडीवर असून विशेषतः आंबा उत्पादनात देश अग्रस्थानी आहे. आपण उत्पादित करत असलेल्या आंब्यांच्या गुणवत्तेला जगात पर्याय




नाही, असेही कृषिमंत्री म्हणाले. तसेच आंबा असो, द्राक्षे, केळी किंवा लिची असो, आपण अग्रगण्य उत्पादकांमध्ये आहोत. मात्र, आपल्या निर्यातीचे प्रमाण अजूनही खूप कमी असल्याचे त्यांनी नमूद केले.

तर केंद्र सरकारची भाजीपाला आणि फळे निर्यातीची इच्छा असल्याचे कृषिमंत्री म्हणाले. सरकारने शेतकरी, निर्यातदार, प्रक्रिया उद्योग आणि अपेडा, एमआयडीएच आणि आयसीएआर यांसारख्या संस्थांना एका व्यासपीठावर आणून या क्षेत्रासमोरील अडचणींवर चर्चा केल्याची माहिती त्यांनी दिली. शेतकरी आणि निर्यातदारांना भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी सरकार काम करत आहे. काही समस्या तातडीने सोडवता येतील, तर काहींसाठी दीर्घकालीन संशोधनाची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन कृषिमंत्री चौहान यांनी केले. दरम्यान, अलीकडेच संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केंद्रीय कृषिमंत्र्यांनी माहिती देताना सांगितले की, काही शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पटीहून अधिक वाढल्याचा दावा केला होता. त्यावरून शेतकरी आणि शेतकरी नेत्यांनी टीकेची झोड उठवली होती.

# शिळ्या आहारामुळे जनावरांचा जीव येतो धोक्यात, होतो चयापचय आजार



आहार घेत असताना नेहमी ताज्या आहाराचे सेवन करावे. ताजा आहार हा शरीरासाठी लाभदायक असतो. एवढंच नाही तर यामुळे आरोग्य निरोगी राहते. हे फक्त मानवाच्या बाबतीत असू शकते असे नाही तर हे जनावरांच्याही बाबतीत पहायला मिळते. गावाकडे बऱ्याचदा जनावरांना उरलेले शिळे अन्न आहारात देत असतात. परंतु शिळ्या अन्नामुळे जनावरे आजारी पडून त्यांचे जीवनमान धोक्यात येऊ शकते. बऱ्याचदा भटकी कुत्रे हे शिळे अन्न खात असतात. यामुळे जनावरांना चयापचयाचा आजार होण्याची दाट संभावना असते. परंतु अशातच अती गंभीर परिस्थितीत जनावरांचा मृत्यू होतो. यामुळे जनावरांना शिळे अन्न देऊ नये, याची काळजी घ्यावी. अन्यथा आजारामुळे जनावरांना अधिकाधिक समस्या होते.

होऊ शकते ही समस्या : या चयापचय आजारामुळे जनावरांचे दूध उत्पादन घटते, फॅट कमी लागते, जनावर चारा पाणी कमी घेत असून मागील पायात जनावर लंगडते, पातळ शेण टाकते, त्यामध्ये बुडबुडे, फेस काही वेळा पोट, आतड्यातील खरवडलेली त्वचा, धान्याचे कण दिसू शकतात. यामुळे काळजी घेणे आवश्यक आहे. अन्यथा जनावरांचा मृत्यू होऊ शकतो.

जनावरांचा होऊ शकतो मृत्यू : चयापचय हा आजार तीव्र आणि मध्यम स्वरूपाचा आहे. या आजाराकडे वेळीस लक्ष दिलं नाही तर जनावरांना धोका होण्याची शक्यता अधिक असून रोगनिदानासाठी अवघड होऊन बसते. अंतिम टप्प्यात जनावराचा मृत्यू देखील होऊ शकतो.

# आले लागवडीची योग्य पद्धत वापरल्यास मिळते भरपूर उत्पादन

भारतातील जवळजवळ सर्व स्वयंपाकघरांमध्ये आल्याचा वापर स्वयंपाकासाठी केला जातो. आले हे एक महत्त्वाचे औषधी पीक आहे, जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. आल्यामध्ये कॅल्शियम, मँगनीज, फॉस्फरस, झिंक आणि व्हिटॅमिन सी यासह अनेक औषधी गुणधर्म असतात. आल्याचा उपयोग औषधी म्हणूनही केला जातो. आल्यापासून बनवलेल्या सुक्या आल्याची बाजारात किंमत जास्त आहे. भारतीय बाजारपेठेत आल्याला वर्षभर मागणी असते. त्यामुळे शेतकरी त्याच्या लागवडीतून चांगला नफा मिळवू शकतात. आले पिकासाठी वालुकामय चिकणमाती माती सर्वोत्तम मानली जाते. या जमिनीत त्याचे पीक चांगले वाढते आणि शेतकऱ्यांना अधिक उत्पादन मिळते. आले लागवडीसाठी मातीची पीएच पातळी ६.० ते ७.५ दरम्यान चांगली मानली जाते. २५ ते ३५ सेल्सिअस तापमान आल्याच्या रोपांसाठी सर्वात योग्य मानले जाते.

योग्य माती आणि हवामान : आले पिकासाठी वालुकामय चिकणमाती माती सर्वोत्तम मानली जाते. या जमिनीत त्याचे पीक चांगले वाढते आणि शेतकऱ्यांना अधिक उत्पादन मिळते. आले लागवडीसाठी मातीची पीएच पातळी ६.० ते ७.५ दरम्यान चांगली मानली जाते. २५ ते ३५



सेल्सिअस तापमान आल्याच्या रोपांसाठी सर्वात योग्य मानले जाते. त्याच्या झाडांना चांगली आर्द्रता आणि योग्य सिंचन आवश्यक आहे. आल्याची पेरणी मार्च-एप्रिलमध्ये केली जाते आणि त्याचे उत्पादन ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये केले जाते.

शेणखताचा वापर : आल्याच्या शेतातून चांगले उत्पादन मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतात शेणखत वापरावे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात कुजलेले शेणखत, निंबोळी आणि गांडूळ खत घालून ते शेताच्या जमिनीत चांगले मिसळावे. यानंतर, माती समतल करावी. आता शेतकऱ्यांना ते लहान-लहान वाफ्यात विभागून हेक्टरी २ ते ३ क्विंटल बियाणे घेऊन शेतात पेरणी करावी लागते. दक्षिण भारतात, आल्याची पेरणी मार्च-एप्रिलमध्ये केली जाते आणि त्यानंतर सिंचन केले जाते.

कमाई लाखात : बियाणे पेरल्यानंतर ८ ते ९ महिन्यांनी पीक पूर्णपणे तयार होते. आल्याचे पीक योग्य प्रकारे पिकल्यावर त्याची वाढ थांबते आणि पिके पिवळी पडून सुकायला लागतात. आल्याची लागवड केल्यास शेतकऱ्यांना हेक्टरी १५० ते २०० क्विंटल उत्पादन मिळू शकते. बाजारात यापैकी एक किलोची किंमत सुमारे ४० रुपये किंवा त्याहून अधिक आहे. त्याची लागवड करून शेतकरी ३.५ ते ४ लाख रुपये सहज कमवू शकतात.

# खरीप हंगामात आंतरपीक पद्धती वापरुन कमवा मोठा नफा

गेल्या दशकापासून हवामानात झालेला बदल, गारपीट, अवकाळी पाऊस, दुष्काळ, टंचाई इत्यादीला बळीराजा सामोरे जात आहे,अशा परिस्थितीत सुधारित परंतु प्रभावी असे तंत्रज्ञान म्हणजे आंतरपीक पद्धत. आंतरपीक पद्धतीमुळे दुष्काळाची झळ कमी बसते आणि पाऊसमान योग्य असल्यास हेक्टरी अधिक धान्योत्पादन होते. खरीप हंगामात आंतरपीक पद्धती योग्य आहे. अवर्षणप्रवण भागातील कोरडवाहू क्षेत्रात बाजरी,सूर्यफुल ,तूर,उडीद मूग,हुलगा, मटकी इत्यादी महत्वाची खरीप पिके आहेत.अति उथळ जमिनीवर सुधारित गवताबरोबर हुलगा किंवा मटकी आणि उथळ जमिनीत बाजरी किंवा सुर्यफूल + तूर (२:१) ओळी या प्रमाणात आंतरपीक पद्धतीची शिफारस केली आहे.

कमी पाण्यात,कमी कालावधीत,कमी उत्पादन खर्चात तूर किंवा तूर + आंतरपीक पद्धतीचा अवलंब केल्यास शेतकरयांना फायदेशीर तर ठरेलच,त्याच बरोबरीने जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मदत होईल.पट्टा पद्धतीत तूर पेरणी केल्यानंतर जोड ओळीतील प्रत्येक तुरीच्या झाडास भरपूर सूर्यप्रकाश, मोकळी हवा मिळते,त्यामुळे फुलांचे शेगांमध्ये रूपांतर करण्याची क्षमता वाढते.त्यामुळे उत्पादकतेत वाढ होते. तुरीच्या पिकातून जमिनीवर पडणारा पालापाचोळा यापासून मिळणाऱ्या सेंद्रिय खतामुळे जमिनीचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. एकरी अर्धा टन सेंद्रिय खत जमिनीस मिळते.तूर पिकामुळे पुढील पिकास एकरी ५० ते ८० किलो नत्र मिळते. तुरीच्या वाढीच्या काळात जमिनीवर पालापाचोळयाच जे आच्छादन तयार होते,त्यामुळे जमिनीवरील ओल्यावर येणाऱ्या लव्हाळा व इतर तणांचे नियंत्रण होण्यास मदत होते.

तूर मधील आंतरपिकांचे आंतर : पारंपारिक पद्धतीत तुरीच्या दोन ओळीतील अंतर दोन ते अडीच फुट ठेवतात.मात्र त्यामुळे तुरीवरील फवारणी करण्यात अनेक अडचणी येतात.तुरीच्या दोन



ओळीत ९० से.मी अंतर आणि १८० से. मी.पट्टा परत पुन्हा ९० से.मी. अंतराच्या तुरीच्या जोडओळी या प्रयोगातून तुरीची उत्पादकता वाढविण्याबरोबरच आंतरपिकांचा लाभ मिळवता येईल.तुरीच्या दोन ओळीत जी संरी पडली जाईल,तिच्यात पावसाचे पाणी मुरेल.या ओलाव्याचा तुरीला लाभ होईल.तुरीची मुळे जमिनीत खोलवर जातात,त्यामुळे जमीन भुसभुशीत पोकळ होते.

भिन्न कालावधी भिन्न मूळ रचना असलेली पिके निवडा : भिन्न कालावधी,भिन्न मूळ रचना असणारी पिके निवडली तर ती एकमेकांबरोबर अनिष्ट स्पर्धा न करता पूरक ठरतात. उदा. बाजरी + तूर (२:१) किंवा सूर्यफुल + तूर ( २:१ ) आंतरपिकातील बाजरी व सूर्यफुलाचा कालावधी ८० ते ९० दिवसाचा असतो.तर तुरीच्या वाणानुसार १२५ ते १६० दिवसांचा राहील. बाजरी अगर सूर्यफुल काढल्यानंतर राहिलेल्या कालावधीतील पाऊस,सूर्यप्रकाश,जमिनीतील ओलावा,अन्नद्रव्ये व जागा ह्याचा तुरीच्या वाढीस उपयोग होतो.बाजरी/सूर्यफुलाची मुळे तंतुमय असल्यामुळे जमिनीच्या वरच्या थरातील ओलावा,अन्नद्रव्याचे चे शोषण होते. तर तुरीस सोटमूळ असल्यामुळे जमिनीतील खालच्या थरातील अन्नद्रव्ये व ओलाव्याचे शोषण होते.त्यामुळे ती एकमेकास पूरक ठरतात. तूर हे कडधान्य पीक असल्यामुळे त्याच्या मुळावरील गाठीत रायझोबियम नावाचे सुक्ष्म जीवाणू असतात ते हवेतील नत्र शोषून जमिनीत गाडतात आणि पुढील पिकास उपलब्ध करून देतात, त्यामुळे जमिनीची सुपिकता वाढते.तूर तयार होते वेळी निम्मा पाला जमिनीवर पडतो.त्यामुळे जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढून पोत सुधारतो.अशा दिव्दल धान्य पिकांचा समावेश आंतरपीक पद्धतीत केल्यास जमिनीची सुपिकता व पोत सुधारून टिकून राहते.

आंतरपिकासाठी तुरीच्या जाती : आंतरपिकांसाठी निवडावयाच्या तुरीच्या जाती या मध्यम मुदतीच्या असाव्यात. अलीकडच्या काळात तूर + सोयाबीन (१:३ किंवा १:४) पद्धतीने पेरल्यास दोन्ही पिकांचे चांगले उत्पादन येत असल्याचे दिसून आले आहे.सोयाबीनच्या ओळीमध्ये ३० से.मी. तर दोन रोपांमध्ये १० से.मी. अंतर ठेवावे आणि सोयाबीनच्या तीन ओळीनंतर एक ओळ तुरीची पेरावी.तुरीच्या दोन ओळीतील अंतर १२० से.मी. येते.तुरीच्या दोन रोपातील अंतर २० से.मी. ठेवावे.सोयाबीन बियाणे ६० ते ६५ किलो प्रती हेक्टर तर ५ किलो तुरीचे बियाणे प्रती हेक्टेरला पुरेसे होते. आंतरपीक पद्धतीमुळे कोणत्याही पिकाचे क्षेत्र कमी न होता नवीन पिकाखाली अधिक क्षेत्र आणता येते आणि उत्पादनात स्थिरता येते. या पद्धतीत खतांचा सुयोग्य आणि पुरेपूर वापर होतो. आंतरपीक पद्धतीत दोन पिके असली तरी मुख्य एका पिकासाठीच देण्याची शिफारस असल्याने दिलेले खत दोन्ही पिकास उपयुक्त ठरते. बाजरी + तूर अगर सूर्यफुल + तूर या आंतरपीक पद्धतीत बाजरी/सूर्यफुल काढल्यानंतर मशागत करणे महत्वाचे असते. कारण मुख्य पीक निघाल्यानंतर, दुसऱ्या पिकांकरिता ओळ टिकवून ठेवणे गरजेचे आहे. त्याकरिता पीक काढल्याबरोबर कुळव चालवून तण व धसकटे उपटून काढून तेथेच वाळू द्यावीत.

आंतरपीक पद्धतीचे फायदे : वर्षात दोन/तीन पिके घेता येतात. जमिनीस कमी मशागत लागते. पावसाचा व सूर्यप्रकाश कालावधीचा उपयोग करता येतो. जमिनीतील ओलावा,अन्नद्रव्ये व जागा यांचा पुरेपूर उपयोग होतो. जमिनीची सुपिकता व पोट सुधारतो. हेक्टरी अधिक उत्पादन होते. विपरीत व प्रतिकूल हंगामात एखादे तरी पीक हाती येते. एकूण मशागत खर्च कमी हेक्टरी नफ्याचे प्रमाण अधिक. आंतरपीक पद्धतीमुळे अनेक प्रकारचे फायदे मिळून, शेतकरी बंधूना जास्त नफा मिळण्यास मदत होते आणि ते ही कमी जागेतून व कमी वेळात.शेतकरीबंधूनी या आंतरपीक पद्धतीचा अवलंब आपल्या शेतावर अवश्य करावा.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५७६ : साली मेवाड शासक महाराणा प्रताप आणि मुघल शासक बादशाहा अकबर यांच्यात हल्दीघटीचे युद्ध झाले.
१६५३ : साली विश्वविख्यात जागतिक वारसा स्थळांच्या यादीत नोंदल्या गेलेली ऐतिहासिक वास्तू ताजमहल ची निर्मिती जवळपास २२ वर्षांनंतर पूर्ण झाली
१८७४ : मुंबईत प्रथम घोड्यांची ट्राम सुरु झाली.
१८७७ : पेरू देशाच्या किनारपट्टीवरील झालेल्या ८.८ तीव्रतेच्या भूकंपामुळे २५४१ लोक ठार झाले.
१९०४ : वाफेवर चालणारे सिटी ट्रुरो हे इंजिन १६० किमी / ताशी पेक्षा जास्त वेगाने धावणारे यूरोपमधील पहिले इंजिन बनले.
१९३६ : इटलीने इथिओपिया देश बळकावला.
१९५५: पश्चिम जर्मनी देशाचा नाटो मधे प्रवेश.
१९७५ : विजेवर चालणारी टंकलेखन मशीन तयार करण्यात आली
१९९९ : अटलांटा ग्रांप्री नेमबाजी स्पर्धेत भारताच्या रुपी उन्नीकृष्णनने प्रोन गटात रौप्यपदक पटकाविले.
१९९९ : ग्वाटेमालाच्या ज्युलिओ मार्टिनेझ याने ग्रॅन्ड प्रिक्स स्पर्धेतील वीस किलोमीटर चालण्याची शर्यत १ तास १७ मिनिटे व ४६ सेकंदात पूर्ण करुन नवा जागतिक विक्रम प्रस्थापित केला.
२००३ : अमेरिकन बहुराष्ट्रीय कंपनी गुगलने इंटरनेट प्रोग्राम एड्सेंस सादर केला.
२००९ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने चंद्रावर पाण्याचा शोध लावण्यासाठी आपला टोही नावाचा उपग्रह प्रक्षेपित केला.
२०१२ : अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रपती बराक ओबामा यांनी समलैंगिक विवाह करण्यास आपली अनुमती दिली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५४० : मेवाडचा प्रसिध्द वीरपुरुष महाराणा प्रताप.
१८१४ : दादोबा पांडुरंग तर्खडकर, इंग्लिश व्याकरणकार, ग्रंथकार
१८३६ : फ्रेंच नेत्र रोग विशेषज्ञ फर्डिनेंड मोनॉयर यांचा जन्मदिन.
१८६६ : गोपाळ कृष्ण गोखले, भारतीय स्वातंत्र्यसेनानी, मराठी समाजसुधारक.
१८८६ : स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक प्रमुख नेते, शेतकरी कामगार पक्षाचे एक संस्थापक केशवराव मारुतराव जेधे यांचा जन्म. (मृत्यू: १२ नोव्हेंबर १९५९ पुणे)
१८९६ : थोर स्वातंत्र्यसैनिक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील प्रमुख नेता व शेतकरी कामगार पक्षाचे संस्थापक केशवराव मारुतराव जेथे यांचा जन्मदिन.
१९२८ : वसंत नीलकंठ गुप्ते, मराठी कामगार चळवळ कार्यकर्ते, लेखक.
१९३५ : सुप्रसिद्ध भारतीय हिंदी कवयित्री स्नेहमयी चौधरी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३३८ : भगवद्भक्त चोखा मेळा हा मंगळवेढे येथील गावकुस बांधत असताना कोसळणार्या कुसबाखाली सापडला.
१९१७ : डॉक्टर, कवी व शास्त्रज्ञ कान्होबा रणझोडदास यांचे निधन.
१९१९ : रेव्हरंड नारायण वामन टिळक यांचे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १८६१)
१९३१ : वर्णपटाद्वारे प्रकाशाच्या मापनासंबंधीच्या शोधासाठी नोबेल पारितोषिक मिळवणारे जर्मन-अमेरिकन पदार्थवैज्ञानिक अल्बर्ट मायकेलसन यांचे निधन. (जन्म: १९ डिसेंबर १८५२)
१९५९ : थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे निधन. (जन्म: २२ सप्टेंबर १८८७)
१९५९ : साली दक्षिण आफ्रिकेतील हिंदी विषयाचे प्राध्यापक व महात्मा गांधी यांचे निकटवर्तीय तसचं, राष्ट्रवादी, हिंदी आणि आर्य सामाजीक भारतीय स्वामी भवानी द्याल संन्यासी यांचे निधन.
१९८६ : एवरेस्ट शिखर सर करणारा शेरपा तेलसिंग नोर्गे यांचे निधन. (जन्म: २९ मे १९१४)
१९९५ : दिग्दर्शक अनंत माने यांचे निधन. (जन्म: २२ सप्टेंबर १९१५)
१९९८ : पार्श्वगायक व अभिनेता, गझलचे बादशहा तलत महमूद यांचे निधन. (जन्म: २४ फेब्रुवारी १९२४ लखनौ, उत्तर प्रदेश)
१९९९ : उद्योगपती करमसीभाई जेठाभाई सोमय्या यांचे निधन.
२००४ : चेचेन्या येथे झालेल्या विस्फोटात तेथील राष्ट्रपती अखमद कादरोव यांचे निधन.
२००८ : किराणा घराण्याचे शास्त्रीय गायक पं. फिरोझ दस्तूर यांचे निधन.
२०१४ : भारतीय राजकारणी नेदुरुमल्ली जनार्दन रेड्डी यांचे निधन. (जन्म: २० फेब्रुवारी १९३५)

# उन्हाळ्यात फळझाडांची काळजी

सद्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. या दिवसांत झाडांना पाण्याची गरज असताना पाणी मिळत नाही. यामुळे शेतकरी वेगवेगळ्याप्रकारे पाणी देण्याचा आणि झाडांभोवती ओल टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात.

फळझाडामध्ये आच्छादनाचा वापर : आच्छादनाचा उपयोग केल्यास पावसाचा जमिनीवर पडण्याचा वेग मंदावतो आणि जमिनीत जास्तीत जास्त पाणी मुरले जाते. आच्छादनाच्या वापरामुळे जमिनीची धूप कमी होते. आच्छादनामुळे जमिनीतील पाण्याचा बाष्पीभवनाचा वेग मंदावतो आणि जमिनीत जास्त काळ टिकतो. तणांच्या वाढीस काही प्रमाणात आळा बसतो. जमिनीत योग्य तापमान राखण्यास मदत होते. जमिनीला भेगा पडण्याचे प्रमाण कमी होते अथवा जमिनीस भेगा पडण्याचा कालावधी लांबतो. आच्छादनाच्या वापराने दिलेल्या खतांचा जास्त कार्यक्षमतेने उपयोग करून घेता येतो. उन्हाळी हंगामात दोन पाण्याच्या पाळ्यातील कालवधी वाढविता येतो. जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढून जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. आच्छादनामुळे पिकांची वाढ चांगली होऊन उत्पादनातही वाढ होते.

खतांची फवारणी करणे : उन्हाळी हंगामात बाष्पीभवन व पर्णोत्सर्जनाचा वेग जास्त असल्यामुळे फळझाडांची पाने कोमजतात. पानांचे तापमान वाढते व पानातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन पानातील अन्नांश तयार होण्याची क्रिया मंदावते. अशा वेळी १ ते १.५ टक्के (१०० ते १५० ग्रॅम १० लिटर पाणी) पोटॅशियम नायट्रेट (३) आणि २ टक्के विद्राव्य डायअमोनियम फॉसपेट (२०० ग्रॅम १० लिटर पाणी) यांची २५-३० दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. यामुळे पानातील अन्नांश तयार होण्याची क्रिया गतिमान होते व झाडे जमिनीतील ओलावा शोषण्यास सुरुवात करतात. फळझाडांना बोर्डोपेस्ट लावणे : उन्हामुळे झाडातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास झाडांच्या खोडावरील साली तडकण्याचे प्रमाण वाढू शकते.

# खरीप हंगामासाठी प्रशासनाने सज्ज राहावे

## शेतकऱ्यांना त्रास झाल्यास तडजोड खपवून घेतली जाणार नाही-आ.खोतकर

जालना। प्रतिनिधी

जालना तहसील कार्यालय येथे तालुकास्तरीय खरीप हंगाम पूर्व नियोजन आढावा बैठक २०२६ आज दिनांक ७ मे रोजी आमदार अर्जुनरावजी खोतकर यांच्या अध्यक्षतेखाली व उपविभागीय अधिकारी रामदास दौंड ,प्रभारी तहसीलदार राजु निहाळ,गटविकास अधिकारी घोळवे, उपविभागीय कृषी अधिकारी पवार,तालुका कृषी अधिकारी राठोड यांच्या उपस्तितीत होती तसेच या बैठकीमध्ये पंडित दादा भुतेकर हे होते.बैठकीत आमदार अर्जुन खोतकर यांनी अत्यंत सखोल व वास्तवता यासंबंधी स्पष्ट व कडक आदेश दिले. आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने आणि जबाबदारीने काम करावे, असे स्पष्ट निर्देश आमदार खोतकर यांनी दिले आहेत. शेतकरी हा शासन व्यवस्थेचा केंद्रबिंदू असून प्रशासनाने केवळ कागदी नियोजन न करता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर द्यावा, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. आमदार अर्जुन खोतकर यांनी कृषी, महसूल, वीज वितरण,




सिंचन, पंचायत समिती, बँका आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना पुढील बाबींवर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत

खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वी बियाणे, खते आणि औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवावा. कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर तात्काळ कठोर कारवाई कराव शेतकऱ्यांना प्रमाणीत बियाणे योग्य दरात उपलब्ध व्हावेत यासाठी कृषी विभागाने दररोज तपासणी मोहीम राबवावी. शेतकऱ्यांना लिंकिंग खाते व बियाणे लादण्याची शक्ती करू नये अशी शक्ती करणाऱ्या विक्रेत्या कडक कारवाई कराव तालुक्यातील सर्व धरणे, बंधारे, कालवे आणि शेततळ्यांची सद्यस्थिती सादर करून पाणी वितरणाचे नियोजन पारदर्शक पद्धतीने करावे. खरीप काळात दिवसा अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी वीज वितरण कंपनीने विशेष नियोजन जाहीर करावे. ट्रान्सफॉर्मर जळाल्यास २४ तासांत बदलण्याची व्यवस्था ठेवावी. पीकविमा योजनेंतर्गत मागील वर्षीच्या प्रलंबित नुकसानभरपाईचे तातडीने वितरण करावे आणि विमा कंपन्यांच्या दिरंगाईबाबत कठोर भूमिका घ्यावी अतिवृष्टी, गारपीट किंवा दुष्काळी परिस्थितीत पंचनामे वेळेत आणि वस्तुनिष्ठ पद्धतीने पूर्ण करावेत. पीककर्ज प्रस्तावांमध्ये बँकांनी अनावश्यक अडथळे निर्माण करू नयेत; सर्व पात्र शेतकऱ्यांना वेळेत कर्ज वितरण व्हावे. कृषी सहाय्यक आणि तलाठी यांनी गावनिहाय पूर्वतयारी बैठका घेऊन आधुनिक शेती, पीक नियोजन आणि रोग नियंत्रणाबाबत मार्गदर्शन करावे. बनावट बियाणे, खत आणि कीटकनाशक विक्रेत्यांवर विशेष मोहीम राबवून फौजदारी कारवाई करावी अपूर्ण सिंचन व ग्रामीण रस्ते कामांची मुदत निश्चित करून आठवड्याला प्रगती आढावा घ्यावा. आमदार अर्जुन खोतकर यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ''शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी एकत्रितपणे काम करत आहेत हा सकारात्मक संदेश गावागावात पोहोचला पाहिजे. कोणत्याही शेतकऱ्याची तक्रार प्रलंबित राहणार नाही. संबंधित अधिकाऱ्यांची थेट जबाबदारी निश्चित केली जाईल. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत कोणतीही हलगर्जी सहन केली जाणार नसून, खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी सर्व विभागाचे अधिकारी व्यापारी प्रतिनिधी प्रगतसिल शेतकरी आदी उपस्थित होते.

# मंठा - तळणी मार्गावर अवैध लाकूड वाहतूक !

## वनविभागाच्या अधिकाऱ्यांचे अर्थपूर्ण तडजोड करून झोपेचे सोंग



मंठा। प्रतिनिधी

सध्या मंठा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड आणि वाहतूक होत असताना वनविभागाचे अधिकारी अर्थपूर्ण तडजोड करून झोपेचे सोंग घेत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

गुरुवार (ता.८ ) रोजी भर उन्हात दुपारी मंठा ते तळणी मार्गावर एकामागून एक असे दोन ट्रॅक्टरद्वारे अवैधरीत्या लाकूड वाहतूकीचा व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यामुळे वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे बिंग फुटले. वनविभागाचे अधिकारी दरमहा मंठा येथे येतात व लाकडू माफियांकडून अर्थपूर्ण तडजोड करून निघून जातात. हे आता उघड झाले आहे. या घटनेमुळे परिसरात अवैध वृक्षतोड व लाकूड वाहतुकीचा प्रकार सुरू असल्याचे निष्पन्न झाले. विशेष म्हणजे, अशा प्रकारांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या वनविभागाच्या अधिकाऱ्यांवरच आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या हफ्तेखाऊ धोरणामुळेच हे प्रकार सुरू आहेत का ? अशी चर्चा रंगू लागली आहे. ग्रामीण भागातील मौल्यवान वनसंपदा मोठ्या प्रमाणात नष्ट होत असताना संबंधित यंत्रणा निष्क्रिय असल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे. दरम्यान, या गंभीर प्रकरणाकडे लोकप्रतिनिधींकडूनही दुर्लक्ष होत असल्याने चिंता व्यक्त होत आहे.

# २११ किमी शेतरस्त्यांचे होणार खडीकरण

## सतीश घाटगे यांच्या पाठपुराव्याला महसूलमंत्र्यांचा प्रतिसाद

घनसावंगी। प्रतिनिधी

घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी भाजप नेते तथा समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची मंत्रालयात भेट घेतली. समृद्धी साखर कारखान्याने स्वखर्चातून तयार केलेल्या २११ किलोमीटर लांबीच्या शेत-पानंद रस्त्यांना 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते' योजनेतून प्रशासकीय मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव त्यांनी सादर केला. या प्रस्तावास महसूलमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत प्रशासकीय अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

घनसावंगी, अंबड आणि जालना या तीन तालुक्यांमध्ये समृद्धी साखर कारखान्याने सामाजिक उत्तरदायित्व निधीतून सुमारे २११ किलोमीटर लांबीच्या शेत व पानंद रस्त्यांचे मातीकाम आणि सपाटीकरण पूर्ण केले आहे. सध्या शेतकरी या रस्त्यांचा वापर करत असले तरी, पावसाळ्यात चिखलामुळे शेतमालाची वाहतूक करणे कठीण होते. हे सर्व रस्ते बारमाही वापरासाठी उपलब्ध व्हावेत, यासाठी त्यांचे खडीकरण व मजबुतीकरण होणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे, कारखान्याने मातीकाम आधीच पूर्ण केल्यामुळे शासनाचा या प्रक्रियेतील ६० ते ७० टक्के खर्च वाचणार आहे. हे सर्व रस्ते 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते' योजनेच्या सर्व तांत्रिक निकषांमध्ये बसत असल्याचे सतीश घाटगे यांनी महसूलमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.

या विषयावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. शेतकरी हितासाठी या २११ किलोमीटरच्या रस्त्यांना 'विशेष बाब' म्हणून मंजुरी देऊन आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यास त्यांनी सहमती दर्शवली असून संबंधित अधिकाऱ्यांना योग्य ते निर्देश दिले आहेत. त्यामुळे घनसावंगी मतदारसंघातील शेत-पानंद रस्त्यांची कामे लवकरच सुरू होतील, असा विश्वास सतीश घाटगे यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, घनसावंगी विधानसभा क्षेत्रातील शेतकरी बांधवांनी आपसातील वाद मिटवून शेतरस्ते खुले करण्याच्या मोहिमेत सहभागी व्हावे, तसेच आपल्या भागातील शेतरस्ते पक्के करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही सतीश घाटगे यांनी केले आहे.

> शेतरस्ते हा केवळ दळणवळणाचा प्रश्न नसून तो शेतकऱ्यांच्या प्रगतीचा मार्ग आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेली 'मुख्यमंत्री बळीराजा शेत पानंद रस्ते' ही योजना शेतकऱ्यांना उभारी देणारी आहे. या योजनेतून 'समृद्धी'ने तयार केलेल्या २११ किमी रस्त्यांच्या खडीकरणासाठी महसूल मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून महाराष्ट्रात खाजगी उद्योग आणि सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी राबवला जाणारा हा पहिला पायलट प्रोजेक्ट ठरणार आहे. त्यामुळे मतदारसंघातील शेतकरी बांधवांनी देखील रस्ते खुले करण्यासाठी सहकार्य करावे, जेणेकरून सर्वांचाच विकास साधता येईल. लवकरच ही कामे पूर्ण करून शेतकऱ्यांना पक्के रस्ते उपलब्ध करून देण्याचा माझा प्रयत्न आहे.
>
> -सतीश घाटगे पाटील,चेअरमन, समृद्धी साखर कारखाना तथा नेते भाजपा

# जेसीबी, ट्रॅक्टरची मिरवणूक काढल्याने गुन्हा दाखल

जालना। प्रतिनिधी

वाळू उपसा करणारे जेसीबी आणि ट्रॅक्टर न्यायालयाच्या आदेशानुसार सोडल्यानंतर आरोपींनी फटाके फोडून आतिषबाजी केली; यामुळे वाळू माफियाला महागात पडले तसेच पोलिसांनी त्यांची मस्ती जिरवली.तसेच ट्रॅक्टर, जेसीबीची जाफराबाद पोलिस स्टेशनपासून मिरवणूक काढली. पोलिस कॉन्स्टेबल विजय जाधव यांनी १३ एप्रिल रोजी देवळारी (ता. जाफराबाद) शिवारातील नदी पात्रात अवैध वाळू उत्खनन सुरू असताना परमेश्वर बकाल याचा एक जेसीबी आणि ट्रॅक्टर जप्त केला होता. गुन्हा दाखल करण्यात आला त्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार रात्री जेसीबी व ट्रॅक्टर पोलिसांनी सोडून दिले. बकाल याने पोलिस स्टेशन मधून जेसीची, ट्रॅक्टर बाहेर काढताना जोरदार फटाक्यांची आतिषबाजी करत त्यांची मिरवणूक काढली. रात्रीच्या वेळी अंधारात रस्त्यावर जप्त करण्यात आलेल्या जेसीबीची मिरवणूक काढण्यात आली.

फटाके कोण फोडत आहेत हे बघण्यासाठी लोक जमा झाले. त्या वेळी जेसीबीच्या समोर फटाके फोडून पोलिसांना आव्हान देणारी गाणी मोबाइलवर वाजवत चकाल आणि त्याचे साथीदार चालले होते. जाफराबाद तालुक्यात पाच नद्यांच्या पात्रांतून अवैध वाळू उपसा करणाऱ्या टोळ्या सक्रिय आहेत या टोळीतील व्यवसाय करणारे काही कथित हप्ता वसुली करणाऱ्या एजंट या राजकारण आणि नेहमीचाच चर्चेचा विषय आहे. सुमारे महिनाभरानंतर न्यायालयाच्या आदेशाने जेसीची आणि ट्रॅक्टर सुटले. मात्र, वाहन ताब्यात घेतल्यानंतर जेसीची चालकाने पोलिस ठाण्याबाहेर आणि गावात ही फटाके जेसीबी, ट्रॅक्टर सोडल्यानंतर मोठ्या प्रमाणात आतषबाजी करण्यात आली. फटाके फोडून जल्लोष केला. एवढजवरच न थांबता, त्याने मोबाईलवर 'झुला झुल मगर बाप को मत भूल' हे गाणे लावले. त्यानंतर 'शांततेत कार्यक्रम होणार तुझा १०० टक्के' असे रील ठेवत पोलिसांना धमक्या दिल्या. याप्रकरणी पोलीस अधीक्षक यांनी तत्काळ आदेश देऊन गुन्हा दाखल करण्यात आला.

# जामखेडमधील कत्तलखाने शहराबाहेर हलवा

## भाजप शहराध्यक्ष संजय काशिद यांचे नगरपरिषदेला निवेदन

जामखेड । प्रतिनिधी

जामखेड शहराच्या मध्यवस्तीत आणि दाट लोकवस्तीच्या भागात असलेले मांसाहारी कत्तलखाने व मांस विक्रीची दुकाने तातडीने शहराबाहेर स्थलांतरित करण्यात यावीत, अशी मागणी जामखेड शहर भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष संजय नारायण काशिद यांनी केली आहे. या संदर्भात जामखेड नगरपरिषद नगराध्यक्षा यांना लेखी निवेदन सादर केले असून, नागरिकांच्या आरोग्याशी खेळू नका, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

शहरातील विविध भागात सध्या मोठ्या प्रमाणावर मांस विक्रीची दुकाने आणि कत्तलखाने सुरू आहेत. ही दुकाने निवासी भागात असल्याने परिसरात प्रचंड दुर्गंधी आणि अस्वच्छता पसरत आहे.

उघड्यावरील मांस विक्री आणि कत्तलखान्यांच्या घाणीमुळे परिसरात आरोग्यविषयक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना या दुर्गंधीचा मोठा त्रास सहन करावा लागत असून परिसरात संसर्गजन्य आजार पसरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी भाजपच्या वतीने हे पाऊल उचलण्यात आले.

नगरपरिषदेने या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन ही सर्व दुकाने आणि कत्तलखाने शहराबाहेर असलेल्या नियोजित ठिकाणी तातडीने हलवावीत, तसेच स्वच्छतेचे नियम कठोरपणे लागू करावेत, अशी मागणी संजय काशिद यांनी निवेदनाद्वारे केली आहे. जर प्रशासनाने यावर तातडीने कारवाई केली नाही, तर आगामी काळात आंदोलनाचा पवित्रा घेण्याचे संकेतही यावेळी देण्यात आले.

हे निवेदन उपनगराध्यक्ष पोपट नाना राळेभात यांना दिले असून यावेळी सरचिटणीस माऊली अंदुरे, मोहन मामा गडदे, उपाध्यक्ष अर्जुन मेहत्रे, श्रीराम डोके आणि प्रवीण होळकर यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इस्त्रायलमध्ये ३ हजार ५०० 'होम बेस्ड केअरगिव्हर पदांसाठी भरती

## जिल्ह्यातील पात्र उमेदवारांना परदेशात नोकरीची संधी

जालना। प्रतिनिधी

इस्त्रायलमध्ये होम बेस्ड केअरगिव्हर पदांसाठी मोठ्या प्रमाणावर भरती जाहीर करण्यात आली आहे. एकूण ३ हजार ५०० पदांसाठी पात्र भारतीय उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. इस्त्रायलमध्ये प्रशिक्षित केअरगिव्हरची वाढती मागणी लक्षात घेता ही भरती प्रक्रिया राबविण्यात येत असून, निवड झालेल्या उमेदवारांना आकर्षक वेतनासह विविध सुविधा उपलब्ध होणार आहेत.

या पदासाठी २५ ते ४५ वर्षे वयोगटातील उमेदवार पात्र असून किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. उमेदवाराला इंग्रजी भाषेचे मध्यम स्तराचे ज्ञान असणे गरजेचे आहे. तसेच पासपोर्ट किमान ३ वर्षांसाठी वैध असावा आणि उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. महिला उमेदवारांना ९० टक्के व पुरुष उमेदवारांना १० टक्के प्रमाणात संधी देण्यात येणार आहे. उमेदवाराने यापूर्वी इस्त्रायलमध्ये काम केलेले नसावे तसेच त्यांचे निकटवर्तीय कुटुंबीय सध्या इस्त्रायलमध्ये वास्तव्यास नसावेत. अनुभव व प्रशिक्षणाच्या बाबतीत, उमेदवाराने केअरगिव्हिंग सेवांमध्ये किमान ९९० तासांचे प्रशिक्षण ( सहित) पूर्ण केलेले असावे किंवा यापैकी कोणतीही पात्रता असणे आवश्यक आहे. निवड झालेल्या उमेदवारांना निवासी स्वरूपात काम करावे लागेल, ज्यामध्ये वृद्ध व दिव्यांग व्यक्तींची दैनंदिन देखभाल, औषधे देणे, हालचालीस मदत करणे तसेच आवश्यकतेनुसार बाहेर नेणे अशा जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. निवड प्रक्रिया ऑनलाइन मुलाखत व व्हिडिओ रेकॉर्डिंगच्या माध्यमातून पार पडणार असून अंतिम निवड इस्त्रायली नियोक्त्याकडून करण्यात येईल व निवड झालेल्या उमेदवारांना मासिक अंदाजे रु. २,००,०००/- इतके वेतन देण्यात येईल.

# रामतीर्थ नदीपात्रात १०० मृत कोंबड्या टाकल्याने दुर्गंधी



जालना। प्रतिनिधी

शहरातील रामतीर्थ स्मशानभूमी परिसरातील नदीपात्रात मोठ्या प्रमाणात मृत कोंबड्या टाकून सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण केल्याप्रकरणी सदर बाजार पोलिस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, जालना महानगरपालिकेतील प्रभारी स्वच्छता निरीक्षक मॅथ्यु वर्गीस चाको (वय ४५) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, ७ मे २०२६ रोजी रामतीर्थ स्मशानभूमी परिसरातील नदीपात्रात पिकअप वाहन क्रमांक एमएच २१ बीएच ९७४२ मधून अंदाजे १०० ते १२५ मृत कोंबड्या आणून टाकल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून, सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. तसेच संसर्गजन्य रोग फैलावण्याची शक्यता निर्माण झाले. तसेच नदीपात्रात मृत कोंबड्या टाकून सार्वजनिक पाणी स्त्रोतात प्रदूषण करुन वातावरण आरोग्यास धोका निर्माण केल्याचा आरोप संबंधीतावर करण्यात आला आहे. या प्रकरणी अज्ञात वाहनचालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम २७१, २७२, २७९, २८०, आणि २९१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जामखेडमध्ये सराफ संरक्षण समिती पदाधिकाऱ्यांवर हल्ल्याचा निषेध; कठोर कारवाईची मागणी

जामखेड । प्रतिनिधी

सराफ संरक्षण समितीचे प्रदेशाध्यक्ष उमेश बुऱ्हाडे, संपर्क प्रमुख अतुल पंडीत, उपसंपर्क प्रमुख उमेश बागडे तसेच सराफ व्यावसायिक भागवत आधापुरे, संजय बुऱ्हाडे आणि संकेत बुऱ्हाडे यांच्यावर पीएसआय गणेश देशमुख व डीबी पथकाकडून अमानुष मारहाण झाल्याचा आरोप करत जामखेडमधील सराफ, सुवर्णकार व संलग्न व्यावसायिकांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या घटनेच्या निषेधार्थ गुरुवारी (दि. ८ मे) महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी सराफ व्यावसायिकांनी व्यवहार बंद ठेवले.

जामखेड पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक दशरथ चौधरी यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यनगर येथे गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या शांततापूर्ण उपोषणाला राज्यभरातून पाठिंबा



मिळत असतानाही पोलिस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. उलट हे आंदोलन दडपण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदनावेळी सराफ सुवर्णकार संरक्षण समितीचे उत्तर महाराष्ट्र प्रसिद्धीप्रमुख मोहन ढाळे, चंद्रकांत ढाळे, ज्ञानेश्वर कुलथे, श्रीकांत कुलथे, सागर कुलथे, सौरभ रुळसमुद्र, गणेश कोल्हे, कृष्णा दीक्षित, महेश डोके, महेश पाटील, अशोक कुलथे, अण्णा कोल्हे, कृष्णा ढाळे, ओम ढाळे, अनंत शेठ चिंतामणी, शैलेश बोळे, भीमराव डूचे, स्वप्निल राजूरकर, पंकज ढाळे, राजेंद्र कुलथे, संजय मुळे, राहुल शहाणे, सोनू वेदपाठक, अजय पेडगावकर, पंडीत आदी उपस्थित होते. निवेदनात संबंधित पीएसआय गणेश देशमुख यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करावे, डीबी पथकावर कठोर कारवाई करावी तसेच दोषींवर विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल करून तातडीने अटक करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सराफ सुवर्णकार संरक्षण समिती, महाराष्ट्र राज्यच्या वतीने न्याय मिळेपर्यंत शांततापूर्ण लढा सुरू ठेवण्यात येईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी घेतले श्री मत्स्योदरी देवीचं दर्शन



अंबड। प्रतिनिधी


छत्रपती शिवजी महाराजस्व समाधान शिबिर अभियानाचा कार्यक्रम राजमाता अहिल्यादेवी होळकर बहुउद्देशीय हॉल श्री मत्स्योदरी देवी संस्थान अंबड येथे झाला यावेळी आ. नारायण भाऊ कुचे , मा. श्री जी श्रीकांत साहेब (विभागीय आयुक्त) श्रीमती अशिमा मित्तल (जिल्हा अधिकारी जालना) मा.श्री उमाकांत पारधी (उप विभागीय अंबड) मा.श्री विजय चव्हाण ,श्री मनोज उकिरडे (मुख्याधिकारी ) श्रीमति देवयानी केदार कुलकर्णी ( नगराध्यक्ष अंबड) यांची उपस्थिती होती यावेळी मा.श्री जी श्रीकांत साहेब (विभागीय आयुक्त) श्रीमती आशिमा मित्तल (जिल्हा अधिकारी जालना) यांनी देवीची पुजा व आरती केली यावेळी विजय चव्हाण यांनी संस्थान तर्फे शाल,श्रीफळ व प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला . यावेळी संस्थान सचिव तथा नायब तहसीलदार श्री एकनाथ भोजने, श्री महेन्द्र गिर्गे अंबड तहसीलचे महसूल कर्मचारी, व सर्व शासनाचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते व तसेच संस्थान कर्मचारी उपस्थित होते.

# चक्क पोलीस निरीक्षकांच्या दालनातच ठिय्या आंदोलन

## पोलीस अधीक्षक शहर ठाण्याच्या निरीक्षकावर कारवाई करणार का?

बीड । प्रतिनिधी

अनेक वेळा आंदोलने करूनही गुन्हा दाखल केला जात नाही याप्रकरणी आज सामाजिक कार्यकर्त्या किस्किंदा पांचाळ आणि बाळासाहेब मोरे या दोघांनी चक्क शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांच्या दालनात जाऊन ठिय्या आंदोलन केले आजपर्यंत विविध कार्यालयाच्या बाहेर आंदोलने पाहिली होती मात्र पहिल्यांदाच कार्यालयामध्ये आंदोलन झाल्याचे दिसून आले येथील जिल्हा



रुग्णालयामध्ये पांचाळ या महिलेचा डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे मृत्यू झाला होता याप्रकरणी निष्काळजीपणा करणाऱ्या डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी सामाजिक कार्यकर्त्या किसकीनदा पांचाळ गेल्या काही महिन्यापासून वेगवेगळ्या पद्धतीने न्याय मागण्यासाठी आंदोलन करत आहेत मागील आठवड्यामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीवर जाऊन शोले स्टाईल आंदोलन करण्यात आले होते तरी देखील न्याय मिळाला नाही आज किस्किंदा पांचाळ बाळासाहेब मोरे यांनी या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी थेट बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ यांच्या कक्षामध्ये जाऊन ठिय्या आंदोलन केले आणि हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले विशेष म्हणजे ठाण्यात किंवा अधिकाऱ्यांच्या केबिनमध्ये आत्तापर्यंत आंदोलन कोणी केल्याचे आठवत नाही मात्र हे आंदोलन कदाचित पहिलेच असावे ठाण्यामध्ये आंदोलन होत असल्याने पोलिसांच्या एकूण कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे आता पोलीस अधीक्षक संबंधित पोलीस निरीक्षकावर कारवाई करतात की आंदोलन कर्त्यावर कारवाई करतात हे लवकरच समजेल

# आष्टी शहरात धूम स्टाईल चोरांचा धुमाकूळ

## महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, गंठण हिसकावणारी टोळी सक्रिय; पोलिसांच्या कार्यक्षमतेवर नागरिकांचा प्रश्नचिन्ह

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरासह आष्टी-कडा महामार्ग परिसरात गेल्या काही दिवसांपासून धूम स्टाईल चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. विशेषतः महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, सोन्याचे गंठण व दागिने हिसकावून दुचाकीवरून पसार होणाऱ्या अज्ञात चोरट्यांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केले आहे. भरदिवसा घडणाऱ्या या घटनांमुळे महिला वर्गामध्ये प्रचंड असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्न उपस्थित होत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या पाच दिवसांपासून आष्टी शहरातील प्रमुख रस्ते, गर्दीचे भाग तसेच आष्टी-कडा महामार्गावर महिलांना लक्ष्य केले जात आहे. दोन अज्ञात इसम दुचाकीवर येतात, क्षणार्धात महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावून भरधाव वेगाने पसार होतात. या घटनांमध्ये काही महिलांना दुखापत झाल्याच्याही चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहेत.

विशेष बाब म्हणजे, या घटना सातत्याने घडत असतानाही पोलिस प्रशासनाकडून ठोस कारवाई होताना दिसत नाही. सीसीटीव्ही तपास, संशयितांची धरपकड अथवा रात्रीच्या गस्तीत वाढ यासारख्या उपाययोजना प्रभावीपणे राबवल्या जात नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे "सद्रक्षणाय खलनिग्रहणाय" या पोलिस ब्रीदवाक्यावरच आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

नागरिकांमध्ये वाढता संताप

धूम स्टाईल चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. "भरदिवसा महिलांचे दागिने हिसकावले जात असताना पोलिस नेमके काय करत आहेत?" असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. अनेकांनी शहरात पोलीस गस्त वाढविण्याची, प्रमुख चौकांमध्ये नाकाबंदी करण्याची तसेच सीसीटीव्ही यंत्रणा अधिक सक्षम करण्याची मागणी केली आहे.

पान २ वर

# परळी आणि बर्दापूरच्या दोन सराईत गुन्हेगारांची 'एमपीडीए' अंतर्गत कारवाई

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुंडगिरीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी बीड पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. याच मोहिमेअंतर्गत, परळी ग्रामीण आणि बर्दापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दोन सराईत गुन्हेगारांविरुद्ध 'एमपीडीए' कायद्यान्वये कारवाई करण्यात आली असून, त्यांची छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात रवानगी करण्यात आली आहे.

दोन्ही आरोपींचा गुन्हेगारी इतिहास

१. सोमनाथ अशोक फड (वय ३१, रा. धर्मापुरी, ता. परळी): याच्यावर खुनाचा प्रयत्न, अवैध शस्त्र बाळगणे, अल्पवयीन मुलीची छेड काढणे, दहशत निर्माण करणे आणि गुटखा विक्री यांसारखे ६ गंभीर गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी त्याच्यावर प्रतिबंधक कारवाई करूनही वर्तनात सुधारणा झाली नव्हती.

२. विष्णु भिमराव राठोड (वय ३२, रा. कुसळवाडी तांडा, ता. अंबाजोगाई): या आरोपीवर हातभट्टीची दारू तयार करणे, चोरटी वाहतूक आणि विक्री करणे यांसारखे ७ गुन्हे दाखल आहेत. वारंवार केलेल्या प्रतिबंधक कारवायांना त्याने केराची टोपली दाखवली होती.

कठोर कारवाईचा इशारा

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी पदभार स्वीकारल्यापासून वाळू माफिया, गुंडगिरी आणि अवैध धंदे करणाऱ्यांविरुद्ध मोहीम तीव्र केली आहे. भविष्यातही वाळूचा अवैध व्यापार, गुटखा विक्री, धार्मिक तेढ निर्माण करणारे आणि खंडणीखोरांवर 'एमपीडीए' व 'मोक्का' () अंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत.

कारवाईत सहभागी पथक

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पान २ वर

# स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई: केज येथील टेम्पो चोरीचा गुन्हा २४ तासांत उघड

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या स्थानिक गुन्हे शाखेने () धडाकेबाज कामगिरी करत केज परिसरातून चोरीला गेलेला आयशर टेम्पो अवघ्या एका दिवसात शोधून काढला आहे. या प्रकरणी दोन सराईत चोरट्यांना जेरबंद करण्यात आले असून, चोरीचा टेम्पो जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

केज येथील रहिवासी नसीर कुरेशी यांनी ५ मे २०२६ रोजी आपला आयशर टेम्पो (क्रमांक -१५--४२४१) घरामागील मोकळ्या जागेत लावला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी टेम्पो त्या ठिकाणी दिसून न आल्याने त्यांनी पोलीस स्टेशन केज येथे तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांच्या पथकाला तपासाचे आदेश दिले. पथकाने घटनास्थळाची पाहणी करून सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, दोन इसम टेम्पो चोरी करताना दिसून आले. तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयित आरोपी उमरे ऊर्फ पाप्या मुस्ताक फारुकी (रा. रोजा मोहल्ला, केज) आणि आवेश ऊर्फ आवडया खाँजा शेख (रा. कोकीजपरी, केज) यांना ताब्यात घेतले.

पोलिसी खाक्या दाखवताच दोन्ही आरोपींनी चोरीची पान २ वर




# योगेश्वरीच्या महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीराचा समारोप

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी व श्रीमती कमल खुरसाळे न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या महिला आत्मभान शिबीराच्या समारोप कार्यक्रम नुकताच संपन्न झाला अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे होत्या

व्यासपीठावर उपाध्यक्ष जी.बी.व्यास, डॉ.जे.बी. मोटेगांवकर, ॲड.के.जे.



विर्धे,प्राचार्य डॉ.पी.एस .देशमुख,विद्यालय विभाग प्रमुख योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनीचे पदाधिकारी,सदस्य उपस्थित होते.

यावेळी बोलताना अश्विनी सोनवणे म्हणाल्या की,महिला आत्मभान प्रशिक्षण शिबिर उपयुक्त असून मुलींमध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी त्याचप्रमाणे त्यांना अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद मिळावी,स्वसंरक्षण करता यावे पान २ वर

# केज येथे सत्यमेव जयते फार्मर कप आयोजित गटबांधणी कार्यशाळा

केज । प्रतिनिधी

केज येथे पाणी फाउंडेशन आयोजित सत्यमेव जयते फार्मर कप स्पर्धा उत्साहाने सुरुवात झाली आहे. मागील काही दिवसांपूर्वी शेतकरी गटाचे प्रशिक्षण पूर्ण झाले. त्या सहभागी निमंत्रक शेतकऱ्यांसाठी केले ते शेतकरी गट बांधणी कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली.

कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे, पर्यावरण मित्र डॉ हनुमंत सौदागर, कृषी विभाग शरद घोबाळे,उमेदच्या तालुका अभियान व्यस्थापक नंदा ओव्हाळ,प्रभाग समन्वयक राजरत्न कसबे,अश्रूबा गोरे,सोनिया चौरे आदींची उपस्थिती होती. तालुक्यातील शेतकरी घटना प्रेरित करून उत्पादन वाढीसाठी एकत्र येऊन गट बांधणी करणे आवश्यक आहे कृषी विभाग कायम सोबत असल्याचे मत कृषी अधिकारी सागर पठाडे यांनी व्यक्त केले. फार्मर कपच्या माध्यमातून शेतकऱ्यांची समृद्धी होईल. शेतकऱ्यांच्या उन्नतीचा हा उत्तम मार्ग असल्याचेकेले डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले.

# पेन्शन धारकांच्या विविध मागण्यांसाठी पेन्शन असोसिएशन बीड वतीने शिक्षणाधिकारी यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषद प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी मोरे साहेब यांची पेन्शनर कर्मचारी असोसिएशन बीड. वतीने भेट घेऊन त्यांचा नवनिर्वाचित शिक्षणाधिकारी म्हणून सत्कार करण्यात आला. व संघटनेच्या वतीने पेन्शनर यांचा विविध मागणीचे निवेदन देण्यात आले.

१) दर महा शासन निर्णय प्रमाणे पेन्शन अदालत घेण्यात यावी. २) ज्या तालुक्यातून जे शिक्षक कर्मचारी सेवानिवृत्त झाले त्यांना तोच तालुका मुख्यालय म्हणून देण्यात यावा. ३) जिल्हास्तरावर सेवानिवृत्त होणाऱ्या पेन्शन धारकांचे उपदान अंश राशीकरण प्रमाणे जिल्हास्तरावर वितरित करण्यात यावा. ४) पेन्शन धारकांचे जिल्हा परिषद आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकांची थकबाकी देण्यात यावी. ५) माध्यमिक शिक्षक



यांची अर्जित रजा मंजूर करून फरक देण्यात यावा. ६) गट विमा सन २०२३ पासून काही प्रस्ताव जिल्हा परिषद कडे पडून आहेत .त्याबाबत संबंधित कर्मचाऱ्यावर कारवाई करावी. ७) पेन्शन धारकांचे अंतिम जी.पी.एफ. प्रस्ताव तात्काळ मंजूर करावा. ८) बरेच पेन्शनर व कुटुंब निवृत्ती धारक हे वयोवृद्ध असून त्यांना विविध आजार ,औषधाची गरज असते त्यामुळे दरमहा एक तारखेला पेन्शन मिळावी. ९) पेन्शन धारकांची निवड श्रेणी वरिष्ठ श्रेणी प्रस्ताव प्रलंबित आहेत त्या प्रस्तावावर कारवाई व्हावी.

वरील सर्व निवेदन देताना सर्व समस्या वर चर्चा करण्यात आली यावेळी पेन्शनर कर्मचारी असोसिएशन अध्यक्ष सुभाष गायकवाड सचिव विनायक सालगुडे सदस्य गोविंद रामदासी व राऊतमारे सर व इतर शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते.

# जवाहर विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

## स्नेहा साळवे १०० टक्के गुण मिळवून प्रथम

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत केसापुरी वसाहत



येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल ८०.१३ टक्के लागला असून स्नेहा नितीन साळवे १०० टक्के, विद्या गणेश सोळंके ९९.४० टक्के,प्रतिक रामराव पवार ९५ टक्के, उत्कर्षा उत्तम वाले ९२.२० टक्के, ज्ञानेश्वरी कल्याण जगताप ९२ टक्के असे गुण घेऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या उत्कृष्ट निकालाची पान २ वर

# राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत आदित्य फार्मसी कॉलेजच्या ऋषिकेश मोहाळेचे यश

बीड । प्रतिनिधी

शहरातील आदित्य फार्मसी कॉलेजचा विद्यार्थी ऋषिकेश सुरेश मोहाळे याने राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सुयश संपादन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित या स्पर्धेत ऋषिकेशने आपल्या प्रभावी वक्तृत्वशैलीने बाजी मारत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



या यशाबद्दल आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी ऋषिकेशचे अभिनंदन करत सत्कार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (), लोणेरे यांच्या वतीने या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्रातील नामांकित महाविद्यालयांतील शेकडो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम फेरीत ऋषिकेशने आपल्या विषयाची सखोल मांडणी, आत्मविश्वासपूर्ण शैली आणि प्रभावी आवाजाच्या जोरावर परीक्षकांची मने जिंकली. सत्कार पान २ वर

# राजस्थानी सेवा समाज या शैक्षणिक संस्थेवर अखेर प्रशासकाची नियुक्ती

बीड । प्रतिनिधी

येथील राजस्थानी सेवा समाज या संस्थेची स्थापना सन १९६६ ला स्वातंत्र सैनिक श्री. मदनलालजी सारडा यांनी समाजातील लोकांना सोबत घेऊन या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली. परंतु गेल्या २०- २२ वर्षापासून काही लोकांनी बोगस कागदपत्र अधारे अनधिकृत या शैक्षणिक संस्थेवर कब्जा केला होता. तेव्हापासून आजपर्यंत बोगस कारभार चालू होता सन २०१० मध्ये रामेश्वर कासट व इतर काही लोकांनी सहाय्यक धर्मादाय कार्यालय बीड येथे बोगस बदल अर्ज दाखल करून कब्जा केला तेव्हापासून संस्थेची कोणतीही सर्वसाधारण सभा न घेता आजपर्यंत अनाधिकृत कब्जा ठेवला होता. मागील सर्व बोगस अर्जाचे धर्मादाय तसेच हायकोर्टात मॅटर चालू आहे. संस्था ताब्यात ठेवून संबंधित लोकांनी संस्थेत करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला. त्यांनी सहा - सात महिन्यापूर्वी असाच बोगस बदल अर्ज दाखल केला खोट्या कागदपत्र आधारे हा अर्ज दाखल करून संबंधित संचालक मंडळ परत संस्था ताब्यात ठेवणार होते. त्यासाठी त्यांनी २२(२) खाली सहाय्यक धर्मादाय कार्यालयात अर्ज दाखल केला व आम्हाला काम करण्याची परवानगी द्यावी अशी मागणी केली परंतु सहाय्यक धर्मादाय अधिकारी श्री चौधरी साहेब यांनी कागदपत्राची पान २ वर


# धर्माचा प्रसार केंद्र असलेली अस्थेची स्थळे भूमिहीन करण्याचा सरकारचा घाट!

## देवस्थान जमीन घोटाळ्यातून राजकारणी बाहेर काढण्याचा हा सरकार प्रयत्न करतंय का?

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने जाहीर केलेल्या "महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम, २०२६" या प्रस्तावित कायद्याविरोधात बीड येथील सामाजिक कार्यकर्ते श्री. सचिन धर्मराज सपकाळ यांनी मा. विभागीय आयुक्त यांच्याकडे सविस्तर हरकत व सूचना दाखल केल्या आहेत. या प्रस्तावित कायद्यामुळे राज्यातील अनेक देवस्थाने भूमिहीन होण्याचा धोका निर्माण होईल तसेच धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्था कोलमडू शकते, अशी गंभीर चिंता त्यांनी व्यक्त केली आहे.

सपकाळ यांनी आपल्या हरकतीमध्ये नमूद केले आहे की, देवस्थान इनाम जमिनी या केवळ मालमत्ता नसून त्या धार्मिक व्यवस्थेचा आर्थिक कणा आहेत. अनेक मंदिरे, मठ, देवस्थाने, दर्गे आणि धार्मिक संस्थांचे दैनंदिन व्यवस्थापन हे संबंधित शेतजमिनींच्या उत्पन्नावर चालते. अन्नदान, महाप्रसाद, यात्रोत्सव, वारकरी सेवा, भजन-



कीर्तन, धर्मशाळा व्यवस्था तसेच गरीब व गरजू भक्तांना मदत अशा अनेक उपक्रमांचे आर्थिक स्रोत हे देवस्थान इनाम जमिनीच आहेत. त्यामुळे या जमिनींचे निर्मूलन झाल्यास धार्मिक व सामाजिक उपक्रमांवर गंभीर परिणाम होणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. हरकतीमध्ये पुढे नमूद करण्यात आले आहे की, ग्रामीण भागातील अनेक देवस्थानांकडे उत्पन्नाचे दुसरे कोणतेही स्थिर साधन उपलब्ध नाही. त्यामुळे इनाम जमिनी कमी झाल्यास किंवा हस्तांतरित झाल्यास मंदिरांची दुरुस्ती, वीजबिल, स्वच्छता, पूजाअर्चा, पुजाऱ्यांचे मानधन व धार्मिक कार्यक्रम चालविणे कठीण होईल. "एकरावरील मंदिरे आता गुंठ्यावर आली आहेत" अशी परिस्थिती अनेक ठिकाणी निर्माण झाल्याचा उल्लेख करत त्यांनी देवस्थानांच्या जागांवर सातत्याने होत असलेल्या अतिक्रमणाकडेही लक्ष वेधले आहे. प्रस्तावित अधिनियमामुळे देवस्थानांच्या मालमत्तेवर व्यापारीकरण आणि प्रभावशाली घटकांचे नियंत्रण वाढण्याची भीती व्यक्त करत सपकाळ यांनी म्हटले आहे की, या कायद्याचा फायदा सर्वसामान्य शेतकऱ्यांपेक्षा आर्थिक व राजकीय प्रभाव असलेल्या घटकांना होण्याची शक्यता अधिक आहे. परिणामी धार्मिक संस्था आर्थिकदृष्ट्या कमकुवत होतील आणि त्यांच्या मूळ धार्मिक व सामाजिक उद्देशाला धक्का बसेल.

तसेच, अनेक देवस्थानांच्या जमिनी या ऐतिहासिक दान, राजाश्रय किंवा धार्मिक सेवेसाठी देण्यात आलेल्या असून त्या सार्वजनिक धर्मकार्यासाठी राखून ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे अशा जमिनींचे निर्मूलन करणे हे मूळ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# एक चुक नडली अन् ७ जण लिफ्टमध्ये अडकले, ३ तास बचावासाठी धडपड

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील सांगवी परिसरात एका इमारतीमध्ये धक्कादायक घटना घडली. इमारतीत असलेल्या लिफ्टमध्ये तांत्रिक बिघाड झाला. त्याच वेळी लिफ्टमध्ये सात जण होते. अचानक लिफ्ट बंद पडल्यामुळे या सात जणांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. नक्की काय झाले आहे हे समजण्याचा मार्ग नव्हता. इमारतीमधील इतर लोकांना ही माहिती मिळाली. त्यांनी तातडीने अग्निशमन दलाला पाचारण केले. त्यानंतर दोन ते तीन तास बचावकार्य सुरू होतं. तो पर्यंत ते सात जण लिफ्टमध्येच होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक परिश्रम घेऊन या सातही जणांची सुखरूप सुटका केली. वेळेत मदत मिळाल्याने मोठा अनर्थ




टळला. सुटका झालेल्या नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास टाकला.

सांगवी येथील गजबजलेल्या कृष्णा चौकाजवळ शंकर प्लाझा ही इमारत आहे. या इमारतीमधील लिफ्टमध्ये सात व्यक्तींनी एकाच वेळी प्रवेश केला होता. मात्र, लिफ्टच्या विहित क्षमतेपेक्षा जास्त वजन झाल्यामुळे लिफ्टमध्ये तांत्रिक बिघाड झाला. यामुळे लिफ्ट दोन मजल्यांच्या दरम्यान अचानक अडकून पडली. आत असलेल्या नागरिकांनी आरडाओरडा केल्यानंतर हा प्रकार आजूबाजूच्या लोकांच्या लक्षात आला. त्यांनी त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. पण दोन मजल्यांच्या मध्ये लिफ्ट अडकली असल्याने ते ही फार काही करू शकले नाही. इमारतीमधील लोकांनी त्यानंतर या बाबतची माहिती अग्निशमन दलाला देण्यात आली. त्यानंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. जवानांनी विलंब न लावता तातडीने घटनास्थळी धाव घेतली. लिफ्ट पूर्णपणे लॉक झाल्यामुळे ती उघडणे मोठे आव्हान होते. अग्निशमन दलाच्या जवानांनी विविध अत्याधुनिक अवजारांचा आणि साहित्याचा वापर करून लिफ्टचे दरवाजे उघडण्याचे प्रयत्न सुरू केले. लिफ्टमध्ये अडकलेल्या व्यक्तींना ऑक्सिजनची कमतरता भासू नये आणि त्यांनी घाबरू नये, यासाठी जवानांनी त्यांच्याशी संवाद सुरू ठेवला. त्यांना धीर दिला. अग्निशमन दलाचे जवान जवळपास २ ते ३ तास लिफ्टचा दरवाजा उघडत होते. शेवटी अथक परिश्रमानंतर लिफ्टचा दरवाजा यशस्वीपणे उघडण्यात आला.आत अडकलेल्या सर्व सातही जणांना सुखरूप बाहेर काढले. बाहेर आल्यानंतर या सर्वांचा जीव भांड्यात पडला. लिफ्ट वापरताना तिच्या क्षमतेपेक्षा जास्त व्यक्तींनी प्रवेश करणे धोक्याचे ठरू शकते. तांत्रिक मर्यादांचे पालन केल्यास असे अपघात टाळता येतात, असे आवाहन अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी यावेळी केले. वेळेवर मदतीला धावून आलेल्या अग्निशमन दलाच्या जवानांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## पुण्यातील उदयोन्मुख क्रिकेटपटूंसाठी सुवर्णसंधी; १५ मे रोजी हडपसरमध्ये रंगणार 'टॅलेंट हंट' स्पर्धा

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे गल्लीतला गोलंदाज ते स्टेडियमचा स्टार असा प्रवास करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या पुणे जिल्ह्यातील तरुण क्रिकेटपटूंसाठी एक मोठी संधी उपलब्ध झाली आहे. पुणे जिल्ह्यातील १४ ते १९ वर्षे वयोगटातील मुले आणि मुलींसाठी येत्या १५ मे २०२६ रोजी एका विशेष क्रिकेट टॅलेंट हंट आणि इव्हॅल्युएशन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हडपसर येथील किंग्स स्पोर्ट्स क्लबमध्ये हा कार्यक्रम पार पडणार आहे.




या स्पर्धेचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे सहभागी खेळाडूंच्या गोलंदाजीचा वेग मोजण्यासाठी 'प्रोफेशनल स्पीड गन'चा (डशिशव ऱ्रीप एींर्श्रीरींळेप) वापर केला जाणार आहे. यामुळे खेळाडूंना आपला नेमका वेग आणि ताकद किती आहे, याचे शास्त्रोक्त मूल्यमापन करून घेता येईल. गोलंदाजीसोबतच फलंदाजीतील कसब (इरीं- ींळपस ढरश्रशपीं) दाखवण्यासाठीही खेळाडूंना व्यासपीठ मिळणार आहे. या निवड प्रक्रियेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचे पुणे डिस्ट्रिक्ट चॅम्पियनशिप लीग (झऊङ) मॅचेस साठी टीम मध्ये सिलेक्शन होणार आहे. या कार्यक्रमाला भारतीय महिला क्रिकेट संघातील स्टार खेळाडू अनुजा पाटील मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या उपस्थितीमुळे तरुण खेळाडूंना मोठे प्रोत्साहन मिळणार आहे. तसेच, खेळाडूंची निवड आणि मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्र रणजी करंडकातील माजी खेळाडू हेमंत किणीकर, सुदेश लाटे आणि माजी राज्यस्तरीय खेळाडू रोहिणी तबीब हे निवड समितीचे (डशश्रशर्ली झरपशश्र) काम पाहणार आहेत. अनुभवी प्रशिक्षकांसमोर आपली कला सादर करण्याची ही खेळाडूंना दुर्मिळ संधी असेल.

## तरूणीवर सामुहिक बलात्कार; न्यायालयाने सुनावली चौघांना २० वर्षे सक्तमजुरी

**पुणे । प्रतिनिधी**

शारीरिक संबंधाचे व्हिडीओ काढून, ते व्हायरल करण्याची धमकी देत तरूणीवर सामुहिक बलात्कार करणाऱ्या चौघांना २० वर्षे सक्तमजुरी आणि ३५ हजार रुपये दंडाची शिक्षा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एच.एम.भोसले यांनी सुनावली.

दंड भरल्यास दंडाची रक्कम पीडितेला देण्यात यावी. दंड न भरल्यास आरोपींना १ वर्ष अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असेही न्यायालयाने आदेशात म्हटले आहे.



नोमान जावेद खान (वय १९), मन्नान जावेद खान (वय २०), सोहेल शेरअली पिरजादे (वय २१) आणि मुस्ताक सलीम सैय्यद (वय ३२चौघेही, रा, देहूरोड, ता. हवेली) अशी शिक्षा झालेल्यांचे नावे आहेत. या प्रकरणात विशेष सरकारी वकील विजय पाटील यांनी २२ साक्षीदार तपासले. त्यामध्ये पीडित २० वर्षीय फिर्यादीची साक्ष, वैद्यकीय पुरावा आणि चार आरोपींसह एका अल्पवयीन आरोपींनी पीडितेच्या मोबाइलवर केलेले ३९८ कॉल हा पुरावा महत्त्वाचा ठरला. देहुरोड येथे जानेवारी ते ३१ मे २०२१ या कालावधीत ही घटना घडली. फिर्यादी आणि नोमान याचे शारीरिक संबंध होते. दोघे संबंध करतानाचा व्हिडीओ क्लिप मुस्ताक याने काढली. ही क्लिप व्हायरल करण्याची धमकी देत तिच्यावर वेळोवेळी बलात्कार आणि अनैसर्गिक कृत्य केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणाचा तपास करून देहूरोड पोलिसांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. सामुहिक बलात्कार, अनैसर्गिक कृत्य, अॅट्रासिटीसह विविध कलमांनी गुन्हा दाखल केला होता. अॅट्रासिटीमधून निर्दोष मुक्तता झाली आहे. हा गुन्हा गंभीर स्वरूपाचा आहे. आरोपींना अधिकाधिक शिक्षा देण्याची मागणी सरकारी वकील विजय पाटील यांनी केली. त्यानुसार न्यायालयाने हा निकाल दिला..

## मोरगाव, थेऊर व सिद्धटेक मंदिर महिनाभर बंद; पुरातत्त्व विभागाकडून जतन, संवर्धनाचे काम

**पुणे । प्रतिनिधी**

अष्टविनायक विकास आराखड्याअंतर्गत तसेच पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या जतन, संवर्धन व दुरुस्ती कामांच्या पार्श्वभूमीवर मोरगावचे श्री मयुरेश्वर, थेऊरचे श्री चिंतामणी आणि सिद्धटेकचे श्री सिद्धिविनायक मंदिरे रविवार (दि. १०) पासून सुमारे महिन्याभरासाठी भाविकांसाठी बंद राहणार आहेत, साधारण ९ जूनच्या कालावधीत ही मंदिरे पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती पुरातत्त्व विभागाने दिली.

विभागाकडून मंदिरांचा मुख्य गाभारा आणि सभामंडप यांचे पौराणिक स्वरूप जपत सुबक दगडी बांधकामाद्वारे संवर्धन करण्यात येणार आहे. या कामादरम्यान भाविकांची मोठ्या प्रमाणातील उपस्थिती कामात अडथळा निर्माण करू शकते तसेच, कामाचा कालावधी वाढण्याची शक्यता असल्याने मंदिरे तात्पुरती बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी विभागाने पुण्याच्या सह धर्मादाय आयुक्तांकडे विनंती अर्ज केला होता. त्यानंतर विभाग, मंदिर प्रशासन, पुजारी वर्ग आणि ग्रामस्थ यांचे म्हणणे ऐकून घेत सह धर्मादाय आयुक्तांनी मंदिरे बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. ही विकासकामे मंदिरांची दीर्घकालीन सुरक्षितता, सुविधा आणि भाविकांच्या सोयीसाठी अत्यंत आवश्यक असून ती नियोजनबद्ध व वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी नागरिकांनी आणि भाविकांनी मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन या वेळी केले आहे.

## खेड शिवापूर टोल नाक्याजवळ टँकरच्या धडकेत दाम्पत्याचा जागीच मृत्यू; संतप्त नागरिकांकडून टँकरची तोडफोड

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील खेड शिवापूर टोल नाक्याजवळ शुक्रवारी (दि.८) दुपारी झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील पती-पत्नीचा जागीच मृत्यू झाला. गॅस टँकरने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने ही दुर्घटना घडली. अपघातानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, वारजे माळवाडी (पुणे) येथील राजेंद्र बबन मोरे (वय ५५) व सविता राजेंद्र मोरे (वय ४२) हे दुचाकी (एमएच १२ एफएच ४६९६) वरून साताऱ्याकडे जात होते. खेड शिवापूर टोल नाक्याच्या पाठीमागील सातारा लेनवर आले असता गॅस टँकर क्रमांक एपी ०३ टीई ५७५९ याने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दोघेही टँकरखाली ओढले गेले आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, टँकर आणि दुचाकी दोन्ही वाहने वेगात होती. टँकर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने अपघात घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. धडकेनंतर दुचाकी रस्त्याच्या कडेला दूरपर्यंत फेकली गेली होती.

घटना घडताच स्थानिक नागरिकांनी तातडीने



मदतीसाठी धाव घेत पोलिसांना माहिती दिली. मात्र, गंभीर दुखापतींमुळे दाम्पत्याचा जागीच मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. अपघातानंतर परिसरात मोठी गर्दी झाली होती. संतप्त नागरिकांनी गॅस टँकरची तोडफोड केल्याची माहिती समोर आली असून काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. वाहतूक सुरळीत करत पंचनामा करण्यात आला. मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत. टँकर चालक राज किशन बी. (रा. तिरुपुरम) याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून या घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

## रघुनाथ येमूल यांची उच्च न्यायालयाकडून निर्दोष मुक्तता; 'नाना गायकवाड' प्रकरणातील सर्व आरोप रद्द

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील उद्योजक नाना गायकवाड यांच्या घरगुती हिंसाचार प्रकरणात आरोपी करण्यात आलेले रघुनाथ राजाराम येमूल यांची मुंबई उच्च न्यायालयाने संपूर्ण निर्दोष मुक्तता केली आहे. न्यायमूर्ती शिवकुमार दिगे यांच्या एकलपीठाने १७ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या आदेशात महाराष्ट्र नरबळी व अघोरी प्रथा आणि काळी जादू प्रतिबंधक कायदा, २०१३ च्या कलम ३(२) अंतर्गत येमूल यांच्यावरील सर्व आरोप रद्द केले.



नाना गायकवाड यांच्या सुनेने ३० जून २०२१ रोजी पती गणेश गायकवाड व सासरच्या मंडळींविरोधात हुंड्यासाठी शारीरिक व मानसिक छळाची तक्रार दाखल केली होती. त्यानंतर १० जुलै २०२१ रोजी नोंदविण्यात आलेल्या पुरवणी जबाबात त्यांनी गणेश गायकवाड यांचे गुरू रघुनाथ येमूल यांनी त्यांच्यात नकारात्मक शक्ती असल्याचे सांगून पतीला पत्नीपासून दूर राहण्याचा सल्ला दिल्याचा आरोप केला होता. या पुरवणी जबाबाच्या आधारे येमूल यांना आरोपी क्रमांक ९ म्हणून गुन्ह्यात समाविष्ट करण्यात आले होते. प्रकरणाचा सविस्तर आढावा घेताना उच्च न्यायालयाने अनेक महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली.

न्यायालयाने नमूद केले की, रघुनाथ येमूल यांचे नाव मूळ ऋखठ मध्ये कुठेही नव्हते. ऋखठ दाखल झाल्यानंतर तब्बल दहा दिवसांनी नोंदवलेल्या पुरवणी जबाबावरून त्यांना प्रथमच आरोपी करण्यात आले. न्यायालयाने पुढे असेही स्पष्ट केले की, आरोपी क्रमांक २ चे चालक राजेशकुमार मिश्रा यांचा जबाब ऋखठ नंतर तीन महिन्यांनी नोंदविण्यात आला होता. तसेच इतर साक्षीदार एकांत पाटील व हितेश भोसले यांचे जबाबही ऐकीव स्वरूपाचे असून त्यांनी प्रत्यक्ष येमूल यांना कोणतेही कृत्य करताना पाहिलेले नाही.

न्यायालयाने आपल्या आदेशात हेही नमूद केले की, रघुनाथ येमूल यांनी तक्रारदार मुक्ताई गायकवाड यांची कधीही प्रत्यक्ष भेट घेतलेली नाही किंवा त्यांच्याशी कोणताही थेट संवाद झाल्याचे पुरावे उपलब्ध नाहीत. ब्लॅक मॅजिक कायद्याच्या संदर्भात न्यायालयाने स्पष्ट केले की, लिंबावर हळद-कुंकू ठेवण्याची कृती कायद्याच्या अनुसूचीत नमूद असली, तरी ती कृती येमूल यांच्या सांगण्यावरून करण्यात आली असल्याचा कोणताही प्रत्यक्ष पुरावा तपास यंत्रणेकडे नाही. राज्य सरकारतर्फे येमूल यांचा २०२२ मधील डिस्चार्ज अर्ज फेटाळण्यात आला होता आणि त्याला आव्हान न देता त्यांनी थेट तिसऱ्या अर्जाद्वारे उच्च न्यायालयात धाव घेतल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. मात्र न्यायमूर्ती दिगे यांनी हा युक्तिवाद फेटाळून लावत, आरोपीविरोधात गुन्हा सिद्ध होत नसेल तर मागील अर्जाला आव्हान न देणे ही बाब आरोपीसाठी घातक ठरू शकत नाही, असे स्पष्ट केले. रघुनाथ येमूल यांच्यावतीने ज्येष्ठ अधिवक्ता अमित देसाई यांनी अॅड. अभिषेक आवचट व अॅड. सिद्धांत देशपांडे यांच्यासह काम पाहिले. राज्य सरकारतर्फे सहायक सरकारी वकील आर. डी. हुमणे यांनी बाजू मांडली, तर फिर्यादी पक्षातर्फे अॅड. सिद्धार्थ जगुष्टे यांनी युक्तिवाद केला.

## जामिनावर बाहेर येताच पाचव्या दिवशी 'गेम'! पुण्यात तरुणीवर हल्ला केलेल्या आरोपीला मध्यरात्रीचं संपवलं, आधी केलेल्या गुन्ह्यामुळं गमावला जीव

**पिपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील काळेवाडी परिसरात जुन्या वादातून एका तरुणाची निर्घृण (झींपश उीळाश छशुी) हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या हल्ल्यात (झींपश उीळाश छशुी) एक जण गंभीर जखमी झाला असून परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी या प्रकरणी एका आरोपीला रात्री अटक केली असून दुसरा आरोपी फरार (झींपश उीळाश छशुी)होता त्यालाही आज अटक केली आहे. मृत तरुणाचे नाव हमीद शेख असे असून त्याचा मावसभाऊ अर्षद शेख हा गंभीर जखमी झाला आहे. रविवारी रात्री उशिरा ही घटना घडली. अनिकेत सूर्यवंशी आणि त्याचा भाऊ विशाल सूर्यवंशी यांनी



धारदार शस्त्राने (झींपश उीळाश छशुी) वार करत दोघांवर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात हमीद शेख याचा जागीच मृत्यू झाला, तर अर्षद याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.(झींपश उीळाश छशुी)

घटनेची माहिती मिळताच काळेवाडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी अनिकेत सूर्यवंशी याला ताब्यात घेतले असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरा आरोपी विशाल सूर्यवंशी हा फरार होता त्याचा शोध घेऊन पोलिसांनी त्यालाही अटक केली आहे.दरम्यान, प्राथमिक तपासात या हत्येमागे जुना वाद आणि एका तरुणीशी संबंधित प्रकरण असल्याची माहिती समोर आली आहे. हमीद शेख हा अवघ्या पाच दिवसांपूर्वीच जामिनावर तुरुंगातून बाहेर आला होता. चार महिन्यांपूर्वी त्याने एकतर्फी प्रेमातून एका तरुणीवर हल्ला केल्याचा आरोप होता. या प्रकरणात त्याच्यावर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता आणि तो तुरुंगात होता. हमीद जामिनावर सुटल्यानंतर तो पुन्हा संबंधित तरुणीला त्रास देईल, अशी भीती मुलीच्या कुटुंबीयांना होती. संबंधित तरुणीचे कुटुंबीय आणि आरोपी सूर्यवंशी बंधू हे एकमेकांचे निकटवर्तीय असल्याची माहिती समोर आली आहे. तरुणीच्या आईने हमीद बाहेर आल्याबाबत चिंता व्यक्त करत आरोपींकडे भीती बोलून दाखवली होती. त्यानंतरच हा हल्ला झाल्याने पोलिस या सर्व घडामोडींचा तपास करत आहेत.या घटनेमुळे काळेवाडी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## पुण्यातील प्रसिद्ध मराठी उद्योजक रवी पंडित यांचे निधन, फोर्ब्स अब्जाधीशांच्या यादीत पटकावले होते स्थान

**पुणे । प्रतिनिधी**

भारतीय माहिती तंत्रज्ञान (खढ) क्षेत्रातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व, 'केपीआयटी टेक्नॉलॉजीज'चे (घझखढ ढशलहपेश्रेसळशी) संस्थापक आणि अध्यक्ष रवी पंडित (ठर्रीं झरपवळीं) यांचे आज, ८ मे रोजी पुण्यात निधन झाले. कंपनीने अधिकृत एक्स्चेंज फायलिंगद्वारे या वृत्ताची माहिती दिली आहे. त्यांच्या निधनाने केवळ पुणेच नव्हे, तर जागतिक ऑटोमोटिव्ह सॉफ्टवेअर क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.

रवी पंडित यांचा प्रवास थक्क करणारा होता. व्यवसायाने चार्टर्ड अकाउंटंट असलेल्या पंडित यांनी केवळ अंकगणितात रस न ठेवता तंत्रज्ञानाचे भविष्य ओळखले. त्यांनी एका छोट्या सीए प्रॅक्टिसला जागतिक स्तरावर ओळखल्या जाणाऱ्या तंत्रज्ञान कंपनीत रूपांतरित केले. आज पुण्यातील मुख्यालय असलेली घझखढ कंपनी त्यांच्या नेतृत्वाखाली १५ देशांमध्ये विस्तारली आहे. जग जेव्हा 'स्मार्ट' आणि



'क्लीन' वाहनांच्या कल्पनेपासून दूर होते, तेव्हा त्यांनी दशकांपूर्वीच 'सॉफ्टवेअर-डिफाईन मोबिलिटी'चे महत्त्व ओळखून भारताला या क्षेत्रात जागतिक नकाशावर स्थान मिळवून दिले. रवी पंडित यांचे योगदान केवळ उद्योगापुरते मर्यादित नव्हते. ते देशातील अग्रगण्य व्यावसायिक सेवा कंपनी 'किर्तने अँड पंडित' चार्टर्ड अकाउंटंट्सचे अध्यक्ष होते. यासोबतच सामाजिक बांधीलकी म्हणून त्यांनी पुणे इंटरनॅशनल सेंटर (झखउ) आणि 'जनवाणी' यांसारख्या संस्थांच्या स्थापनेत मोलाची भूमिका बजावली. ज्ञान प्रबोधिनीचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी अनेक वर्षे काम केले. गोखले इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून त्यांनी शाश्वत विकासासाठी धोरणात्मक संशोधनाला नेहमीच प्रोत्साहन दिले. शैक्षणिक क्षेत्रात रवी पंडित यांची कामगिरी देदीप्यमान होती. ते चार्टर्ड अकाउंटन्सीमध्ये सुवर्णपदक विजेते होते. त्यांनी अमेरिकेतील प्रतिष्ठित एमआयटी (चखढ) स्लोन स्कूल ऑफ मॅनेजमेंटमधून उच्च शिक्षण घेतले होते. त्यांच्या बौद्धिक क्षमतेमुळेच त्यांना इंडियन नॅशनल सायन्स अकॅडमीमध्ये 'फेलो' म्हणून गौरवण्यात आले होते. त्यांचे 'लिपफ्रॉगिंग टू पोल-वॉल्टिंग' हे पुस्तक आजही नवीन उद्योजकांसाठी दीपस्तंभाप्रमाणे कार्य करत आहे. पुण्याला 'स्मार्ट सिटी' बनवण्यासाठी त्यांनी 'जनवाणी'च्या माध्यमातून कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक वाहतूक यांसारख्या मूलभूत समस्यांवर उपाय शोधण्यासाठी काम केले. तंत्रज्ञान आणि मानवी मूल्ये यांचा संगम त्यांच्या प्रत्येक कार्यात दिसून येत असे. तसेच, फोर्ब्स अब्जाधीशांच्या यादीत देखील त्यांनी स्थान पटकावले होते.

## वडगावशेरीत दोन बांधकाम व्यवसायीकांत मोठा वाद; ४० जणांवर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

वडगावशेरीतील कोट्यवधी रुपयांच्या जागेच्या वादातून दोन बांधकाम व्यवसायीकांत मोठा वाद उफाळून आला. यातील एका बांधकाम व्यवसायीकाने बांधकाम सुरू असलेल्या साइटवर जबरदस्तीने घुसखोरी करीत गेटची तोडफोड केली.

वाहने आत घातली तसेच वॉचमनला मारहाण करीत जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून बांधकाम व्यावसायिक रविंद्र हिरालाल दुगड (वय ५८, रा. बिबवेवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानूसार बांधकाम व्यवसायीक अमित लुंकड तसेच राज ढाकलिया, रुपेश ढाकलिया, बिडकर आणि ३० ते ४० अनोळखी व्यक्तींविरोधात गुन्हा नोंदविला आहे. पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, दुगड ग्रुपच्या माध्यमातून रविंद्र दुगड हे बांधकाम व्यवसाय करतात. मौजे वडगावशेरी येथील सर्व्हे नंबर ३० मधील सुमारे ४० गुंठे जागा पूर्वी विविध व्यवहारांद्वारे विकत घेतली होती. त्यापैकी ३१ गुंठे जागा २०२३ मध्ये सुमित राठोड यांच्याकडून दुगड इन्फ्रास्ट्रक्चर एलएलपीच्या नावे खरेदी करण्यात आली. जागा खरेदी केल्यानंतर सर्व परवानग्या घेऊन मागील दोन महिन्यांपासून साइटवर बांधकाम सुरू होते. दरम्यान, गुरूवारी (७ मे) सायंकाळी ०५:३० च्या सुमारास लुंकड यांच्यासह ३० ते ४० जण १० ट्रॅक्टर, डंपर आणि वॉटर टँकर घेऊन साइटवर आले, त्यांनी साईटचे आत वाहने घुसवली तसेच वॉचमनला मारहाण केली. घटनेची माहिती मिळताच रविंद्र दुगड आणि त्यांचा मुलगा ऋषभ दुगड घटनास्थळी पोहोचले.. त्यावेळी काही जणांनी हा प्लॉट आमचा आहे, इथून निघून जा, नाहीतर जीवे मारू, अशी धमकी दिली. घटनास्थळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद पवार यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतले. यानंतर आरोपी निघून गेले.

## 'लहान मुलांवर अत्याचार करणाऱ्यांना रस्त्यावर मारलं पाहिजे'

**पुणे । प्रतिनिधी**

लहान मुलांवर अत्याचार करणारे नराधम आहेत, त्यांना कोणत्याही परिस्थितीत माफी मिळता कामा नये. माझे वैयक्तिक मत विचाराल तर अशा क्रूर लोकांना रस्त्यावरच मारले पाहिजे. आपण लोकशाहीत जगतो ही गोष्ट वेगळी, पण कायद्याने अशा गुन्हेगारांना कोणत्याही परिस्थितीत सोडता कामा नये, अशा शब्दांत सामाजिक कार्यकर्त्या अमृता फडणवीस यांनी आपला तीव्र संताप व्यक्त केला. पुण्यात एका घरगुती कार्यक्रमासाठी आल्या असताना त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.

अत्याचाराच्या वाढत्या घटनांवर भाष्य करताना अमृता फडणवीस म्हणाल्या की, सध्या पालकांनी अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. अनेकदा विश्वासातील व्यक्तींकडूनच अशा प्रकारचे कृत्य घडत असल्याचे समोर येत आहे, ही चिंतेची बाब आहे. अशा विकृत मानसिकतेच्या लोकांना समाजात



वावरू न देता कायमस्वरूपी तुरुंगात ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी समाजात योग्य शिक्षण आणि जनजागृती होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. असे क्रूर गुन्हेगार बाहेर येतातच कसे? हा माझा मोठा प्रश्न आहे, असे म्हणत त्यांनी थेट उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही यासंदर्भात विचारणा करणार असल्याचे सांगितले. कायद्यात कुठे त्रुटी राहिल्या आहेत का, याचा अभ्यास होणे गरजेचे आहे. जे नराधम अत्याचार करतात, त्यांच्या पाठीशी कोणीही उभे राहू नये आणि अशा क्रूर लोकांना लवकरात लवकर कठोर शिक्षा व्हावी, असा सल्ला त्यांनी सरकारला दिला आहे. देशातील सर्वात कठोर कायदा अशा गुन्हेगारांना लागू करावा, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये 'सेक्शुअल हॅरॅसमेंट' संदर्भात कडक नियम असतात. तिथे अशा तक्रारींवर त्वरित अधिकृत कारवाई केली जाते आणि गुन्हे दाखल होतात. त्याच धर्तीवर सामाजिक स्तरावरही तातडीने क्शन घेणे गरजेचे आहे, तरच असले गुन्हे थांबतील. राज्यातील नेतृत्वाबाबत विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी महत्त्वाचे विधान केले. जी महिला पुढे येऊन अन्यायाविरुद्ध लढेल, मग त्या सुनेत्रा वहिनी असोत किंवा भाजपची कोणतीही महिला नेत्या, त्यांनी पुढे येऊन राज्याचे मुख्यमंत्री बनले पाहिजे, असे त्या म्हणाल्या. महिलांच्या प्रश्नांवर लढणाऱ्या नेतृत्वाची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली.